# मिरा भाईंदर महानगरपालिका

## प्रशासकीय ठरावासाठी गोषवारा

## // बांधकाम/ विद्युत विभाग //

दि.०८/०७/२०२४

**प्रकरण क्रमांक. ( ०९ )** मिरा भाईदर महानगरपालिका मालमत्ता भाड्याने देणेसाठीचे धोरण ठरविणेकरीता एजन्सी नेमणेस मान्यता देणे.

मिरा-भाईदर महानगरपालिकेमार्फत शहरात नागरिकांच्या सोयी सुविधांसाठी विविध समाजमंदिर, सभागृह, उद्याने, मैदाने, व्यायामशाळा, कलादालने, इ. बांधण्यात आलेली आहे.

सदर मालमत्ता नागरिकांना तसेच सार्वजनिक/ खाजगी संरचना वापरण्यासाठी भाड्याने देण्यात येत आहे. सदर मालमत्ता भाड्याने देणेसाठी मा. महासभा ठराव दि.26/02/2018 ठराव क्र.90 व मा. महासभा दि.31/10/2020 ठराव क्र.83 अन्वये धोरण व भाडे निश्चित करण्यात आले आहे.

सद्यस्थितीतील भाडेदर अत्यंत कमी असून, सदर मालमत्ता देखभाल दुरुस्ती खर्च वाढलेला आहे.

महानगरपालिकेच्या नविन तयार होणाऱ्या खालील मालमत्तांचे बाजारभावानुसार भाड्यांचे मुल्यांकन होणे आवश्यक आहे-

1. भाईदर (प.) मिनि स्पोर्टस कॉम्पलेक्स
2. भाईदर (पूर्व) आरक्षण क्र.241 अप्पासाहेब धर्माधिकारी हॉल
3. घोडबंदर किल्ला
4. मैदाने
5. तसेच खालील मालत्ताबाबत सुधारीत धोरण व सुधारीत भाडे निश्चित होणे आवश्यक आहे.
6. उद्याने
7. शुटींगसाठी रस्ते, इमारती
8. सार्वजनिक जागा भाड्याने देणे

सदरील सर्व जागांचे मुल्यांकन व नवीन धोरण तयार करणेसह नविन भाडे ठरविण्यासाठी एक स्वतंत्र एजन्सीची नेमणूक करणे आवश्यक आहे.

स्वतंत्र एजन्सी कार्यपध्दती खालीलप्रमाणे असेल.

1. शहरातील सर्व मनपा मालमत्ताचे मुल्यांकन करणे.
2. बाजार मुल्यांकनानुसार भाडे ठरविणे (नियम, GR, परिपत्रके)
3. इतर शहरातील कार्यपध्दती आणि भाडे अभ्यास अहवाल तयार करणे.

4. मालमत्ता सुस्थितीत व सुधारणा उपाययोजना सुचविणे.

5. मालमत्ता वापरण्याचे नियम व अटीशर्ती तयार करणे.

6. मालमत्तांचे अद्ययावत धोरण अहवाल तयार करणे.

सदर एजन्सी नेमणेसाठी ई निविदा प्रसिध्द करून दर मागविण्यात येणार असून सदर कामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता घेण्यात येईल. तत्पूर्वी सदर खर्चासाठी अर्थसंकल्पात पुर्नविनियोजनाव्दारे पुरेशी तरतुद प्रशासकीय ठरावाव्दारे उपलब्ध करून घेण्यात येईल. सदर कार्यवाही पुर्ण झाल्यावरच कामाचे कार्यादेश देण्यात येतील. तरी सदर एजन्सी नेमणेसाठी प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देणेस शिफारस आहे.

(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा भाईदर महानगरपालिका

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने**

मा. महासभा / स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि. 13/08/2024 दुपारी 4:00वा.
रजिस्टर नोंद क्र. ४९ 2024/25
13/8/24
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-05/DK/24-25/MG-1

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव ०९ दिनांक :- ०८|०८|२०२४

**प्रकरण क्रमांक :-** ( ०९) मिरा भाईंदर महानगरपालिका मालमत्ता भाड्याने देणेसाठीचे धोरण ठरविणेकरीता एजन्सी नेमणेस मान्यता देणे.

## कार्यालयीन प्रस्तावना

मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत शहरात नागरिकांच्या सोयी सुविधांसाठी विविध समाजमंदिर, सभागृह, उद्याने, मैदाने, व्यायामशाळा, कलादालने, इ. बांधण्यात आलेली आहे.

सदर मालमत्ता नागरिकांना तसेच सार्वजनिक/ खाजगी संरचना वापरण्यासाठी भाड्याने देण्यात येत आहे. सदर मालमत्ता भाड्याने देणेसाठी मा. महासभा ठराव दि.26/02/2018 ठराव क्र.90 व मा. महासभा दि.31/10/2020 ठराव क्र.83 अन्वये धोरण व भाडे निश्चित करण्यात आले आहे.

सद्यस्थितीतील भाडेदर अत्यंत कमी असून, सदर मालमत्ता देखभाल दुरुस्ती खर्च वाढलेला आहे.

महानगरपालिकेच्या नविन तयार होणाऱ्या खालील मालमत्तांचे बाजारभावानुसार भाड्यांचे मुल्यांकन होणे आवश्यक आहे-

1. भाईंदर (प.) मिनि स्पोर्टस कॉम्पलेक्स
2. भाईंदर (पूर्व) आरक्षण क्र.241 अप्पासाहेब धर्माधिकारी हॉल
3. घोडबंदर किल्ला
4. मैदाने
5. तसेच खालील मालत्ताबाबत सुधारीत धोरण व सुधारीत भाडे निश्चित होणे आवश्यक आहे.
6. उद्याने
7. शुटींगसाठी रस्ते, इमारती
8. सार्वजनिक जागा भाड्याने देणे

सदरील सर्व जागांचे मुल्यांकन व नवीन धोरण तयार करणेसह नविन भाडे ठरविण्यासाठी एक स्वतंत्र एजन्सीची नेमणूक करणे आवश्यक आहे.

स्वतंत्र एजन्सी कार्यपध्दती खालीलप्रमाणे असेल.

1. शहरातील सर्व मनपा मालमत्ताचे मुल्यांकन करणे.

2. बाजार मुल्यांकनानुसार भाडे ठरविणे (नियम, GR, परिपत्रके)

3. इतर शहरातील कार्यपध्दती आणि भाडे अभ्यास अहवाल तयार करणे.

4. मालमत्ता सुस्थितीत व सुधारणा उपाययोजना सुचविणे.

5. मालमत्ता वापरण्याचे नियम व अटीशर्ती तयार करणे.

6. मालमत्तांचे अद्ययावत धोरण अहवाल तयार करणे.

सदर एजन्सी नेमणेसाठी ई निविदा प्रसिध्द करून दर मागविण्यात येणार असून सदर कामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता घेण्यात येईल. तत्पूर्वी सदर खर्चासाठी अर्थसंकल्पात पुर्नविनियोजनाव्दारे पुरेशी तरतुद प्रशासकीय ठरावाव्दारे उपलब्ध करून घेण्यात येईल. सदर कार्यवाही पुर्ण झाल्यावरच कामाचे कार्यादेश देण्यात येतील. तरी सदर एजन्सी नेमणेसाठी प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देणेबाबत प्रशासनाचा प्रस्ताव आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ०९ दिनांक ०८/०७/2024**

वरील प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452 (अ) च्या (1अ) व (1ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2)/ नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, श्री. संजय काटकर, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केल्यानूसार मनपाच्या मालमत्ता भाड्याने देण्याकरीता धोरण तयार करून देणेसाठी अनुभवी एजन्सी नेमण्यासाठी या ठरावाव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

सदर कामाबाबतची पुढील कार्यवाही नियमानुसार संबधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(संजय काटकर, भाप्रसे)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत :- बांधकाम/ विद्युत विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

PC-05/DK/24-25/MT-1

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## बांधकाम / विद्युत विभाग

## // गोषवारा //

दि. ०८/०७/२०२४

प्रकरण क्रमांक ( ०२ ) :- मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी स्ट्रीट लाईट पोल बसविणे.

वरील संदर्भिय विषयानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी मे. अदानी इलेक्ट्रीसिटी कं.लि यांच्या समवेत नविन स्ट्रीट लाईट पोल बसविणेकामी पहाणी करण्यात आलेली आहे. त्या अनुशंगाने खालील प्रमाणे नविन स्ट्रीट लाईट पोल बसविण्यासाठी प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत.

| अ.क्र | ठिकाणाचे नाव | स्ट्रीट लाईट पोल संख्या | लाईट वॅटेज क्षमता | प्रस्ताव क्र. व दिनांक |
|---|---|---|---|---|
| 1) | केशवसृष्टी रोड | 30 Nos | 50 W LED | MBD/BW/003/2024-25 Date-10/04/2024 |
| 2) | केबिन एक्स रोड नर्मदा नगर भाईंदर | 09 Nos | 105 W LED | MBD/BE/001/2024-25 Date-10/04/2024 |
| 3) | रॉयल व्हिलेज टु एम आय डी सी रोड मिरारोड | 20 Nos | 105 W LED | MBD/ME/074/2023-24 Date-27/03/2024 |
| 4) | लिंक रोड भाईंदर (प.) | 17 Nos | 105 W LED | MBD/BW/072/2023-24 Date-27/03/2024 |
| 5) | घोडबंदर किल्ला रोड | 20 Nos | 105 W LED | MBD/BE/071/2023-24 Date-26/03/2024 |
| 6) | घोडबंदर बस स्टॉप एन आर राज बादली गल्ली | 06 Nos | 170 W LED | MBD/BE/070/2023-24 Date-26/03/2024 |
| 7) | राम नगर चगोक मिरारोड | 06 Nos | 170 W LED | MBD/BE/004/2024-25 Date-10/04/2024 |
| 8) | नव उलवन सोसायटी श्रुती सेक्टर - 03 | 06 Nos<br>01 Nos | 105 W LED<br>170W LED | MBD/ME/001/2024-25 Date-10/04/2024 |
| 9) | उत्तन रोड मौर्या | 03 Nos | 50 W LED | MBD/BW/005/2024-25 Date-10/04/2024 |
| 10) | उत्तन वेलंकनी | 04 Nos | 50 W LED | MBD/BW/006/2024-25 Date-10/04/2024 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 11) | धावगी रोड नियर डम्पींग ग्राऊंड उत्तन | 04 Nos | 50 W LED | MBD/BW/007/2024-25 Date-10/04/2024 |

सदर ठिकाणी नविन स्ट्रीट लाईट पोल बसविणेसाठी मे. अदानी इलेक्ट्रीसिटी कं.लि यांना कार्यादेश करीता मान्यता देण्यास शिफारस आहे.

(दिपक खांबित)
**शहर अभियंता**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने**

PC-03/2024-25/PJ/MG-01

मा. महासभा / स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि. १४/०६/२०२४ ५.१३=२० वा.
रजिस्टर नोंद क्र. ४६२ २०२४/२५
सचिव
१४/६/२४
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव दिनांक ०८|०७| 2024

**प्रकरण क्र. ( ०२ ) :-** मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी स्ट्रीट लाईट पोल बसविणेबाबत.

वरील संदर्भिय विषयानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी मे. अदानी इलेक्ट्रीसिटी कं.लि यांच्या समवेत नविन स्ट्रीट लाईट पोल बसविणेकामी पहाणी करण्यात आलेली आहे. त्या अनुशंगाने खालील प्रमाणे नविन स्ट्रीट लाईट पोल बसविण्यासाठी प्रस्ताव प्राप्त झालेले आहे..

त्या अनुशंगाने खालीलप्रमाणे तपशिल तयार करण्यात आले आहे.

| अ.क्र | ठिकाणाचे नाव | स्ट्रीट लाईट पोल संख्या | लाईट वॅटेज क्षमता | प्रस्ताव क्र. व दिनांक |
|---|---|---|---|---|
| 1) | केशवसृष्टी रोड | 30 Nos | 50 W LED | MBD/BW/003/2024-25 Date-10/04/2024 |
| 2) | केबिन एक्स रोड नर्मदा नगर भाईंदर | 09 Nos | 105 W LED | MBD/BE/001/2024-25 Date-10/04/2024 |
| 3) | रॉयल व्हिलेज टु एम आय डी सी रोड मिरारोड | 20 Nos | 105 W LED | MBD/ME/074/2023-24 Date-27/03/2024 |
| 4) | लिंक रोड भाईंदर (प.) | 17 Nos | 105 W LED | MBD/BW/072/2023-24 Date-27/03/2024 |
| 5) | घोडबंदर किल्ला रोड | 20 Nos | 105 W LED | MBD/BE/071/2023-24 Date-26/03/2024 |
| 6) | घोडबंदर बस स्टॉप एन आर राज बादली गल्ली | 06 Nos | 170 W LED | MBD/BE/070/2023-24 Date-26/03/2024 |
| 7) | राम नगर चगोक मिरारोड | 06 Nos | 170 W LED | MBD/BE/004/2024-25 Date-10/04/2024 |
| 8) | नव उलवन सोसायटी श्रुती सेक्टर -03 | 06 Nos<br>01 Nos | 105 W LED<br>170W LED | MBD/ME/001/2024-25 Date-10/04/2024 |
| 9) | उत्तन रोड मौर्या | 03 Nos | 50 W LED | MBD/BW/005/2024-25 Date-10/04/2024 |
| 10) | उत्तन वेलंकनी | 04 Nos | 50 W LED | MBD/BW/006/2024-25 Date-10/04/2024 |
| 11) | धावगी रोड नियर डम्पींग ग्राऊंड उत्तन | 04 Nos | 50 W LED | MBD/BW/007/2024-25 Date-10/04/2024 |

नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-2020/ प्र.क्र.71(भाग-21)/नवि-14 दि.26 ऑगस्ट 2022अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतूद व विशेषत: कलम 452 अ चा (1अ) व (1ब) मधील तरतूदीनुसार मा.आयुक्त श्री संजय काटकर यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असून त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत. वरील प्रमाणे नविन स्ट्रीट लाईट पोल बसविण्यासाठी प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे.

## प्रशासकीय ठराव क्र. ०२ दिनांक ०९/ ०६ /2024

वरील प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452 (अ) च्या (1अ) व (1ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, संजय काटकर, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केल्यानुसार प्रस्तावनेत नमुद मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी स्ट्रीट लाईट पोल बसविणेकामी मे. अदानी इलेक्ट्रीसिटी कं.लि यांना कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

वरील कामाबाबतची पुढील कार्यवाही नियमानुसार संबधित विभागाने विहित पध्दतीने करावी

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(संजय काटकर, भाप्रसे)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रत बांधकाम विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## प्रशासकीय ठरावासाठी गोषवारा

## बांधकाम / विद्युत विभाग

दि. ०८/०७/२०२४

**प्रकरण क्रमांक. ( 03 )** मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील गटारे, नाले यावर विविध झाकणे बसविणे कामाच्या सुधारीत खर्चास प्रशासकीय आर्थिक मान्यता देणे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील गटारे, नाले यावर विविध झाकणे बसविणे कामाचे संदर्भिय पत्रान्वये अन्वये मे.एन.जे.ब्रदर्स यांना कार्यादेश देण्यात आले असुन सदर कामाची मुदत दि.21/08/2023 ते दि.20/08/2024 पर्यंत आहे. सदर काम हे रु.5.00 कोटी इतक्या रक्कमेचे असुन सद्यस्थिती रु.5.00 कोटी इतके काम करण्यात आले आहे.

सद्यस्थितीत गटारे व झाकणे टाकण्याचे नविन कामाचे नविन कार्यादेश दिले नसल्याने तसेच जुन्या कामाची तरतुद संपली असल्याने ठेकेदारामार्फत झाकणे पुरवठा बंद करण्यात आला होता.

गटारावील झाकणे टाकणे हे अत्यावश्यक असुन गटारावर झाकणे नसल्याने काही अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सद्यस्थितीत नविन निविदा प्रक्रीया करण्यात आली आहे. तथापी लोकसभा व विधानपरीषदेची निवडणूक सुरू असल्याने कार्यादेश देऊ शकत नाही. शहरातील फुटपाथ, गटारे व नाल्याची पावसाळ्यापूर्वी साफसफाई सुरू असल्याने सदर तुटलेली व मिसिंग झाकणे तातडीने बसविल्यास अपघात होणार नाही. सदर वस्तूस्थिती लक्षात घेता मे.एन.जे. ब्रदर्स या कंत्राटदाराची मुदत ही दि.20/08/2024 पर्यंत असल्याने रु.5.00 कोटी व्यतिरिक्त लागणारी रु.1,49,84,938/- कोटी रकमेची झाकणे मंजूर दराने बसविणेस व सदर रकमेसह सुधारीत रु.6,49,84,938/- रकमेच्या सुधारीत खर्चास लोकहीतास्तव व अत्यावश्यक बाब म्हणून प्रशासकीय ठरावाद्वारे प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेस शिफारस आहे.

(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त यांच्या मान्यतेने

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव 03 दिनांक :- ०६/०६/२०२४

प्रकरण क्रमांक :- ( 03 ) मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील गटारे, नाले यावर विविध झाकणे बसविणे कामाच्या सुधारीत खर्चास प्रशासकीय आर्थिक मान्यता देणे.

## कार्यालयीन प्रस्तावना

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील गटारे, नाले यावर विविध झाकणे बसविणे कामाचे संदर्भिय पत्रान्वये अन्वये मे.एन.जे.ब्रदर्स यांना कार्यादेश देण्यात आले असुन सदर कामाची मुदत दि.21/08/2023 ते दि.20/08/2024 पर्यंत आहे. सदर काम हे रु.5.00 कोटी इतक्या रक्कमेचे असुन सद्यस्थिती रु.5.00 कोटी इतके काम करण्यात आले आहे.

सद्यस्थितीत गटारे व झाकणे टाकण्याचे नविन कामाचे नविन कार्यादेश दिले नसल्याने तसेच जुन्या कामाची तरतुद संपली असल्याने ठेकेदारामार्फत झाकणे पुरवठा बंद करण्यात आला होता.

गटारावील झाकणे टाकणे हे अत्यावश्यक असुन गटारावर झाकणे नसल्याने काही अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सद्यस्थितीत नविन निविदा प्रक्रीया करण्यात आली आहे. तथापी लोकसभा व विधानपरीषदेची निवडणूक सुरू असल्याने कार्यादेश देऊ शकत नाही. शहरातील फुटपाथ, गटारे व नाल्याची पावसाळ्यापूर्वी साफसफाई सुरू असल्याने सदर तुटलेली व मिसिंग झाकणे तातडीने बसविल्यास अपघात होणार नाही. सदर वस्तूस्थिती लक्षात घेता मे.एन.जे. ब्रदर्स या कंत्राटदाराची मुदत ही दि.20/08/2024 पर्यंत असल्याने रु.5.00 कोटी व्यतिरिक्त लागणारी रु.1,49,84,938/- कोटी रकमेची झाकणे मंजूर दराने बसविणेस व सदर रकमेसह सुधारीत रु.6,49,84,938/- रकमेच्या सुधारीत खर्चास लोकहीतास्तव व अत्यावश्यक बाब म्हणून प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देणेबाबत प्रशासनाचा प्रस्ताव आहे.

## प्रशासकीय ठराव क्र. 03 दिनांक ०६ / ०६ /2024

वरील प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषतः कलम 452 (अ) च्या (1अ) व (1ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2)/ नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. श्री. संजय काटकर, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केल्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील गटारे, नाले यावर विविध झाकणे बसविणे कामाच्या रु.6,49,84,938/- रकमेच्या सुधारीत खर्चास या ठरावाव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

सदर कामाबाबतची पुढील कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(संजय काटकर, भाप्रसे)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत :- बांधकाम/ विद्युत विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## // बांधकाम विभाग //

### // गोषवारा // दि.०८/०५/२०२४

**प्रकरण क्रमांक. (०४)** - मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध योजनेतील संक्रमण शिबिरे व रेन्टल हाऊसिंग स्कीम मधील इमारती या मधील आवश्यक दुरुस्ती कामे तातडीने पुर्ण करणेसाठी मान्यता देणे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत रस्ता रुंदीकरण, आरक्षण बाधित व धोकादायक इमारती मधील तसेच बी.एस.यु.पी. योजनेतील लाभार्थी हे घोडबंदर, काशी येथील संक्रमण शिबिर तसेच एम.एम.आर.डी.ए. कडील महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झालेल्या रेन्टल हाऊसिंग इमारतीमधील इमारतीमध्ये राहत आहेत. सदर संक्रमण शिबिरासाठी वापरत असलेल्या इमारती व बैठी घरे या मध्ये सुमारे 1800 रहिवाशी आहेत. सदर इमारतीमध्ये मोठ्या प्रमाणावर दुरुस्ती कामे करावयाची असुन त्यामध्ये पत्रे, ताडपत्री टाकणे, शौचालय दुरुस्ती, संक्रमण शिबिरातील दुरुस्ती, इमारती मधील लिकेज व इतर दुरुस्ती कामे करण्यासाठी, टेरेस गळती, इ. साठी रु.41,11,650/- (जी.एस.टी. सह) एवढा खर्च येणार आहे. सदर कामे करण्यासाठी व्दिवार्षिक पध्दतीने निविदा मागविण्यात आली असुन प्रशासकिय ठरावाव्दारे खर्चास मान्यता प्राप्त आहे. तथापि, लोकसभा व विधापरीषद निवडणुक आचारसहीतेमुळे कार्यादेश देता येत नाही. सदर कामासाठी मागील वर्षाच्या निविदेची मुदत दि.11/04/2024 रोजी संपलेली असुन प्रस्तावित कामे पावसाळा सुरु होणार असल्याने तातडीने करावयाची असल्याने कंत्राटदार मे. उदबुके दत्ता साहेबराव यांचे मंजुर दराने प्रस्तावित कामे करुन घेण्यासाठी मान्यता देणेस मान्यता असावी. सदर कामासाठी अर्थसंकल्पात "अटलजी आवास योजना (BSUP) ब) मनपा / कर्ज" या लेखाशिर्षाखाली तरतुद उपलब्ध असुन त्यामधुन कामे करुन घेण्यास मा.प्रशासकीय ठरावाव्दारे मान्याता मिळण्यास शिफारस आहे.

(दिपक खांबित)
**शहर अभियंता**
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने**

PC-09/VP/2024-25/YJ/MG-02

# <u>मिरा-भाईंदर महानगरपालिका</u>

प्रशासकीय ठराव दिनांक 0९ / 0६ /202४

**विषय क्र. (0४)** :- मा. आयुक्त महोदयाकडील कामकाज

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध योजनेतील संक्रमण शिबिरे व रेन्टल हाऊसिंग स्कीम मधील इमारती या मधील आवश्यक दुरुस्ती कामे तातडीने पुर्ण करणेसाठी मान्यता देणे.

**कार्यालयीन प्रस्तावना**

मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत रस्ता रुंदीकरण, आरक्षण बाधित व धोकादायक इमारती मधील तसेच बी.एस.यु.पी. योजनेतील लाभार्थी हे घोडबंदर, काशी येथील संक्रमण शिबिर तसेच एम.एम.आर.डी.ए. कडील महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झालेल्या रेन्टल हाऊसिंग इमारतीमधील इमारतीमध्ये राहत आहेत. सदर संक्रमण शिबिरासाठी वापरत असलेल्या इमारती व बैठी घरे या मध्ये सुमारे 1800 रहिवाशी आहेत. सदर इमारतीमध्ये मोठ्या प्रमाणावर दुरुस्ती कामे करावयाची असुन त्यामध्ये पत्रे, ताडपत्री टाकणे, शौचालय दुरुस्ती, संक्रमण शिबिरातील दुरुस्ती, इमारती मधील लिकेज व इतर दुरुस्ती कामे करण्यासाठी, टेरेस गळती, इ. साठी रु.41,11,650/- (जी.एस.टी. सह) एवढा खर्च येणार आहे. सदर कामे करण्यासाठी व्दिवार्षिक पध्दतीने निविदा मागविण्यात आली असुन प्रशासकिय ठरावाव्दारे खर्चास मान्यता प्राप्त आहे. तथापि, लोकसभा व विधापरीषद निवडणुक आचारसहीतेमुळे कार्यादेश देता येत नाही. सदर कामासाठी मागील वर्षाच्या निविदेची मुदत दि.11/04/2024 रोजी संपलेली असुन प्रस्तावित कामे पावसाळा सुरु होणार असल्याने तातडीने करावयाची असल्याने कंत्राटदार मे. उदबुके दत्ता साहेबराव यांचे मंजुर दराने प्रस्तावित कामे करुन घेण्यासाठी मान्यता देणेस मान्यता असावी. सदर कामासाठी अर्थसंकल्पात "अटलजी आवास योजना (BSUP) ब) मनपा / कर्ज" या लेखाशिर्षाखाली तरतुद उपलब्ध असुन त्यामधुन कामे करुन घेण्यास मा.प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे.

**<u>प्रशासकीय ठराव क्र. 0४ दिनांक ९ / ६ /202४</u>**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध योजनेतील संक्रमण शिबिरे व रेन्टल हाऊसिंग स्कीम मधील इमारती या मधील आवश्यक दुरुस्ती कामे तातडीने पुर्ण करणेसाठी प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452 (1अ) व (1ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2) / नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी श्री. संजय काटकर, प्रशासक, मिरा-भाईंदर महानगरपालिका, मा.महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्यात नमुद प्रस्तावानुसार कंत्राटदार मे. उदबुके दत्ता साहेबराव यांचे मंजुर दराने प्रस्तावित कामे करुन घेण्यासाठी व रु.41,11,650/- वाढीव खर्चास तसेच सदर काम अर्थसंकल्पातील "अटलजी आवास योजना (BSUP) ब) मनपा / कर्ज" या लेखाशिर्षाखाली तरतुदी मधुन करुन घेण्यास मान्यता देत आहे.

वरील कामाबाबत पुढील कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागाने विहीत पध्दीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(संजय काटकर, भाप्रसे)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रत बांधकाम विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना**

PC-9/2023-24/YJ/MT - 05

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## प्रशासकीय ठरावासाठी गोषवारा

## // बांधकाम/ विद्युत विभाग //

दि. ०९/०७/२०२४

**प्रकरण क्रमांक. ( ०४ )** मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिकेची सार्वजनिक शौचालये, दुरुस्ती कामे तसेच उद्याने, मैदाने, दुभाजक, फाऊंटन, सेल्फी पॉईंट इ. मधील अत्यावश्यक दुरुस्ती कामे बांधकाम / विद्युत विभागातील विविध मालमत्ता द्विवार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे कामाच्या मंजूर दरानूसार करून घेण्यास व त्याकामी येणाऱ्या सुधारीत खर्चास मान्यता देणे.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेची घनकचरा व्यवस्थापन विभागातंर्गत सार्वजनिक शौचालये दैनदिन संचलन, देखभाल व दुरुस्ती कामाचे कंत्राट रद्द करण्यात आलेले असुन नविन कंत्राटदार नेमण्याची प्रक्रीया ही आचारसंहीतेमुळे पुर्ण झालेली नाही. त्याचप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने, मैदाने, दुभाजक इ. मधील आवश्यक दुरुस्ती कामांची निविदा उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागामार्फत काढण्यात आलेली आहे. परंतु लोकसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 ची आचार संहीता लागू झाल्याने निविदा प्रक्रीया पुर्ण झालेली नाही.

बांधकाम/ विद्युत विभागामार्फत मनपा क्षेत्रातील विविध मालमत्ता उदा. स्मशानभुमी, दफनभुमी, मनपा मुख्य कार्यालय इमारत, मनपा प्रभाग कार्यालये, शाळा इमारती, बालवाडी, अंगणवाडी, अग्निशमन केंद्र, स्काय वॉक, पुतळे, सभागृह, समाजमंदीरे, विरंगुळा केंद्र, स्टेज, वाचनालय, अभ्यासिका व इतर सार्वजनिक इमारती, बसडेपो, बसस्टँड, आयुक्त / महापौर निवास, विविध नामफलक, दिशादर्शक फलक, आरोग्य केंद्र, रुग्णालय, इ. तळी विहीरी, दुभाजक, वाहतुक बेट, सार्वजनिक इमारती, गळती प्रतिबंधक कामे ही द्विवार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्तीचे काम मे. देव इंजिनिअर्स या कंत्राटदारास या प्रशासकीय ठराव क्र.437 दि.12/03/2024 रोजीच्या मान्यतेने दि.14/03/2024 रोजीच्या कार्यादेशान्वये देण्यात आलेले आहे. सदर कामाची अंदाजित रक्कम रु.8,47,57,763/- इतकी आहे. सदर कामाची मुदत ही 24 महीने असुन दि.13/03/2026 पर्यंत आहे.

सदर कामाच्या अंदाजपत्रकात सर्व दुरुस्ती कामाचे दर मंजूर असुन सदर मंजूर दराने सार्वजनिक शौचालये व उद्याने, मैदाने, दुभाजक, सेल्फी पॉईट इ. मधील आवश्यक दुरुस्ती कामे करून घेण्यासाठी मा. आयुक्त यांनी मान्यता दिलेली असून त्याअंतर्गत खालीलप्रमाणे अंदाजपत्रक तयार करून कामास सुरूवात करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| 1 | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्र.1, 2 व 3 मधील विविध उद्याने, मैदाने व स्मशानभूमी यामध्ये स्थापत्य विषयक कामांची देखभाल व दुरूस्ती करणे. | रु.3,20,000/- |

| | | |
|---|---|---|
| 2 | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्र.1, 2 व 3 मधील विविध उद्याने, मैदाने व स्मशानभूमी यामध्ये स्थापत्य विषयक कामांची देखभाल व दुरूस्ती करणे. | रु.10,28,300/- |
| 3 | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध उद्यानामधील शौचालय दुरुस्ती करणेबाबत. (प्रभाग समिती क्र.4, 5 व 6) | रु.2,58,064/- |
| 4 | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्र.4, 5 व 6 मधील असणारे उद्यान/ खेळाचे मैदाने यामधील स्थापत्य विषयक कामांची देखभाल व दुरूस्ती करणे. | रु.22,07,100/- |
| 5 | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्र.1, 2, 3 व 6 मधील शौचालयांची देखभाल व दुरूस्ती करणे. | रु.85,64,415/- |
| 6 | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्र.4 मधील शौचालये दुरूस्ती करणे. | रु.14,06,010/- |
| | **एकूण** | **रु.1,37,83,889/-** |

मे. देव इंजिनिअर्स यांना रु.8,47,57,763/- रकमेचे कार्यादेश दिलेले आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिकेची सार्वजनिक शौचालये, दुरुस्ती कामे तसेच उद्याने, मैदाने, दुभाजक, सेल्फी पॉईट इ. मधील अत्यावश्यक दुरुस्ती कामासाठी होणारा रु.1,37,83,889/- हा वाढीव खर्च होणार आहे. तरी सदर खर्चासह अत्यावश्यक व लोकहितास्तव करावे लागणाऱ्या रु.9,85,41,652/- सुधारीत खर्चास मान्यता देणेस शिफारस आहे.

(दिपक खांबित)
**शहर अभियंता**
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने**

मा. महासभा / स्थायी समिती सभा
१९/०६/२०२४ स. ११:०० वा.
४९५ २०२४/२५
लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-05/DK/24-25/MG-2

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव ०५ दिनांक :- ६/०६/२०२४

**प्रकरण क्रमांक :- ( ०५ )** मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिकेची सार्वजनिक शौचालये, दुरुस्ती कामे तसेच उद्याने, मैदाने, दुभाजक, फाऊंटन, सेल्फी पॉईट इ. मधील अत्यावश्यक दुरुस्ती कामे बांधकाम / विद्युत विभागातील विविध मालमत्ता द्विवार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे कामाच्या मंजूर दरानूसार करून घेण्यास व त्याकामी येणाऱ्या सुधारीत खर्चास मान्यता देणे.

## कार्यालयीन प्रस्तावना

मिरा-भाईंदर महानगरपालिकेची घनकचरा व्यवस्थापन विभागातंर्गत सार्वजनिक शौचालये दैनदिन संचलन, देखभाल व दुरुस्ती कामाचे कंत्राट रद्द करण्यात आलेले असुन नविन कंत्राटदार नेमण्याची प्रक्रीया ही आचारसंहीतेमुळे पुर्ण झालेली नाही. त्याचप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने, मैदाने, दुभाजक इ. मधील आवश्यक दुरुस्ती कामांची निविदा उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागामार्फत काढण्यात आलेली आहे. परंतु लोकसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 ची आचार संहीता लागू झाल्याने निविदा प्रक्रीया पुर्ण झालेली नाही.

बांधकाम/ विद्युत विभागामार्फत मनपा क्षेत्रातील विविध मालमत्ता उदा. स्मशानभुमी, दफनभुमी, मनपा मुख्य कार्यालय इमारत, मनपा प्रभाग कार्यालये, शाळा इमारती, बालवाडी, अंगणवाडी, अग्निशमन केंद्र, स्काय वॉक, पुतळे, सभागृह, समाजमंदीरे, विरंगुळा केंद्र, स्टेज, वाचनालय, अभ्यासिका व इतर सार्वजनिक इमारती, बसडेपो, बसस्टँड, आयुक्त / महापौर निवास, विविध नामफलक, दिशादर्शक फलक, आरोग्य केंद्र, रुग्णालय, इ. तळी विहीरी, दुभाजक, वाहतुक बेट, सार्वजनिक इमारती, गळती प्रतिबंधक कामे ही द्विवार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्तीचे काम मे. देव इंजिनिअर्स या कंत्राटदारास या प्रशासकीय ठराव क्र.437 दि.12/03/2024 रोजीच्या मान्यतेने दि.14/03/2024 रोजीच्या कार्यादेशान्वये देण्यात आलेले आहे. सदर कामाची अंदाजित रक्कम रु.8,47,57,763/- इतकी आहे. सदर कामाची मुदत ही 24 महीने असुन दि.13/03/2026 पर्यंत आहे.

सदर कामाच्या अंदाजपत्रकात सर्व दुरुस्ती कामाचे दर मंजूर असुन सदर मंजूर दराने सार्वजनिक शौचालये व उद्याने, मैदाने, दुभाजक, सेल्फी पॉईट इ. मधील आवश्यक दुरुस्ती कामे करून घेण्यासाठी मा. आयुक्त यांनी मान्यता दिलेली असून त्याअंतर्गत खालीलप्रमाणे अंदाजपत्रक तयार करून कामास सुरूवात करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| 1 | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्र.1, 2 व 3 मधील विविध उद्याने, मैदाने व स्मशानभूमी यामध्ये स्थापत्य विषयक कामांची देखभाल व दुरूस्ती करणे. | रु.3,20,000/- |
| 2 | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्र.1, 2 व 3 मधील विविध उद्याने, मैदाने व स्मशानभूमी यामध्ये स्थापत्य विषयक कामांची देखभाल व दुरूस्ती करणे. | रु.10,28,300/- |

| | | |
|---|---|---|
| 3 | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध उद्यानामधील शौचालय दुरुस्ती करणेबाबत. (प्रभाग समिती क्र.4, 5 व 6) | रु.2,58,064/- |
| 4 | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्र.4, 5 व 6 मधील असणारे उद्यान/ खेळाचे मैदाने यामधील स्थापत्य विषयक कामांची देखभाल व दुरूस्ती करणे. | रु.22,07,100/- |
| 5 | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्र.1, 2, 3 व 6 मधील शौचालयांची देखभाल व दुरूस्ती करणे. | रु.85,64,415/- |
| 6 | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क्र.4 मधील शौचालये दुरूस्ती करणे. | रु.14,06,010/- |
| | **एकूण** | **रु.1,37,83,889/-** |

मे. देव इंजिनिअर्स यांना रु.8,47,57,763/- रकमेचे कार्यादेश दिलेले आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिकेची सार्वजनिक शौचालये, दुरुस्ती कामे तसेच उद्याने, मैदाने, दुभाजक, सेल्फी पॉईट इ. मधील अत्यावश्यक दुरुस्ती कामासाठी होणारा रु.1,37,83,889/- हा वाढीव खर्च होणार आहे. तरी सदर खर्चासह अत्यावश्यक व लोकहितास्तव करावे लागणाऱ्या रु.9,85,41,652/- सुधारीत खर्चास मान्यता देणेबाबत प्रशासनाचा प्रस्ताव आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. 04 दिनांक 08/06/2024**

वरील प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452 (अ) च्या (1अ) व (1ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2)/ नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, श्री. संजय काटकर, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केल्यानूसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिकेची सार्वजनिक शौचालये, दुरुस्ती कामे तसेच उद्याने, मैदाने, दुभाजक, फाऊंटन, सेल्फी पॉईट इ. मधील अत्यावश्यक दुरुस्ती कामे बांधकाम / विद्युत विभागातील विविध मालमत्ता द्विवार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे कामाच्या मंजूर दरानूसार करून घेण्यास व त्याकामी येणाऱ्या सुधारीत खर्चास या ठरावाव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

सदर कामाबाबतची पुढील कार्यवाही नियमानुसार संबधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(संजय काटकर, भाप्रसे)
**प्रशासक तथा आयुक्त**
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रत :- बांधकाम/ विद्युत विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना**

PC-05/DK/24-25/MT-3

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## बांधकाम विभाग

// गोषवारा //

दि. ९/०५/2024

**प्रकरण क्र.:- ( ०६ )** मा.आयुक्त यांनी मंजूर केलेल्या कामांचे अवलोकन करणे.

| अ. क्र | कामाचे नाव | अंदाजित खर्च (जी.एस.टी. वगळुन) | ठेकेदाराचे नाव | मंजूर दर |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पुर्व) नर्मदा नगर सोसायटी समोरील रेल्वे क्रॉसिंग कल्वर्ट सफाई करणे. | रु.5,08,912/- | मे. इनवायरो केम इंटरप्रायझेस | 0.15% कमी दराने |
| 2. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील पंजाब फाऊंड्री येथील कल्वर्ट सफाई करणे | रु.5,84,069/- | मे. इनवायरो केम इंटरप्रायझेस | 0.10% कमी दराने |
| 3. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पुर्व) नयानगर रेल्वे क्रॉसिंग कल्वर्टची सफाई करणे. | रु.6,96,659/- | मे. इनवायरो केम इंटरप्रायझेस | 0.10% कमी दराने |
| 4. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर पश्चिम, रेल्वे समांतर रस्त्यावर पाणी जाण्यासाठी पाच ठिकाणी आर.सी.सी पाईप टाकणे. | रु.4,64,087/- | मे. आशापुरा कंस्ट्रक्शन कं. | 0.010% कमी दराने |

वरील निविदेच्या दरास मा.आयुक्त यांनी जी.एस.टी. सह मंजुरी दिली आहे. सदर कामे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73 (ड) नुसार अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहेत.

**(दिपक खांबित)**
शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव दिनांक 08/06/2024

**विषय क्र. ( 06 ) :-** मा.आयुक्त यांनी मंजूर केलेल्या कामांचे अवलोकन करणे.

| अ. क्र | कामाचे नाव | अंदाजित खर्च (जी.एस.टी. वगळुन) | ठेकेदाराचे नाव | मंजूर दर |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पुर्व) नर्मदा नगर सोसायटी समोरील रेल्वे क्रॉसिंग कल्वर्ट सफाई करणे. | रु.5,08,912/- | मे. इनवायरो केम इंटरप्रायझेस | 0.15% कमी दराने |
| 2. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील पंजाब फाऊंड्री येथील कल्वर्ट सफाई करणे | रु.5,84,069/- | मे. इनवायरो केम इंटरप्रायझेस | 0.10% कमी दराने |
| 3. | मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पुर्व) नयानगर रेल्वे क्रॉसिंग कल्वर्टची सफाई करणे. | रु.6,96,659/- | मे. इनवायरो केम इंटरप्रायझेस | 0.10% कमी दराने |
| 4. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर पश्चिम, रेल्वे समांतर रस्त्यावर पाणी जाण्यासाठी पाच ठिकाणी आर.सी.सी पाईप टाकणे. | रु.4,64,087/- | मे. आशापुरा कंस्ट्रक्शन कं. | 0.010% कमी दराने |

## कार्यालयीन प्रस्तावना

वरील 04 कामाच्या निविदा धारकानी अंदाजपत्रकिय दरापेक्षा कमी दराची निविदा सादर केली आहे. मा.आयुक्त महोदय यांनी सदरचे दर स्विकारण्यास मान्यता दिलेली आहे. नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दि.26 ऑगस्ट 2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुद व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) मधील तरतुदीनुसार मा.आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असुन त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत. सदर अधिकारात वरील 04 कामाला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम 73 (ड) नुसार प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ०६ दिनांक ६/०७/२०२४**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील 04 कामाच्या निविदेस मान्यता देण्याच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452 (अ) च्या (1अ) व (1ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, संजय काटकर, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा.महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन खालील कामाच्या अंदाजपत्रकिय दराच्या निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73 (ड) नुसार मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र | कामाचे नाव | अंदाजित खर्च (जी.एस.टी. वगळुन) | ठेकेदाराचे नाव | मंजूर दर |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पुर्व) नर्मदा नगर सोसायटी समोरील रेल्वे क्रॉसिंग कल्वर्ट सफाई करणे. | रु.5,08,912/- | मे. इनवायरो केम इंटरप्रायझेस | 0.15% कमी दराने |
| 2. | मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील पंजाब फाऊंड्री येथील कल्वर्ट सफाई करणे | रु.5,84,069/- | मे. इनवायरो केम इंटरप्रायझेस | 0.10% कमी दराने |
| 3. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पुर्व) नयानगर रेल्वे क्रॉसिंग कल्वर्टची सफाई करणे. | रु.6,96,659/- | मे. इनवायरो केम इंटरप्रायझेस | 0.10% कमी दराने |
| 4. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर पश्चिम, रेल्वे समांतर रस्त्यावर पाणी जाण्यासाठी पाच ठिकाणी आर.सी.सी पाईप टाकणे. | रु.4,64,087/- | मे. आशापुरा कंस्ट्रक्शन कं. | 0.010% कमी दराने |

वरील कामाबाबतची पुढील कार्यवाही नियमानुसार संबधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(संजय काटकर भाप्रसे)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## बांधकाम विभाग

दि. ९/०७/2024

// गोषवारा //

**प्रकरण क्र. ( ०७ ) :- निविदेस मान्यता देणेबाबत.**

| अ. क्र | टेंडर आय डी | कामाचे नाव | अंदाजित खर्च | निविदाधारकाचे नाव | सादर केलेला दर |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1. | 804768_1 | धारावी देवी धारावी मंदीर डोंगरी या ठिकाणी सुशोभिकरण व मुलभुत नागरी सुविधा उपलब्ध करणे. (प्रादेशिक पर्यटन विकास योजना) | रु.66,72,610/- | **मे. कुणाल संजय कदम**<br><br>मे. श्री इंटरप्रायझेस<br>मे. श्री गणेश इंटरप्रायझेस | **0.0100 % कमी दराने**<br><br>4.5000 % जास्त दराने<br>2.5000 % जास्त दराने |

वरील कामी निविदाधारकाने अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराच्या निविदा सादर केली आहे. मा.आयुक्त महोदय यांनी सदरचे दर स्विकारण्यास मान्यता दिलेली आहे. नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दि.26 ऑगस्ट 2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुद व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) मधील तरतुदीनुसार मा.आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असुन त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत. सदर अधिकारात वरील कामांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम 73 (क) नुसार मान्यता देण्यास शिफारस आहे.

(दिपक खांबित)
**शहर अभियंता**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने**

PC8/DK/24-25/PG-3

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव दिनांक ०८/०७/2024

**विषय क्र. ( ०७ ) :-** मा. आयुक्त महोदयाकडील कामकाज

**निविदेस मान्यता देणेबाबत.**

| अ. क्र | टेंडर आय डी | कामाचे नाव | अंदाजित खर्च | निविदाधारकाचे नाव | सादर केलेला दर |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1. | 804768_1 | धारावी देवी धारावी मंदीर डोंगरी या ठिकाणी सुशोभिकरण व मुलभुत नागरी सुविधा उपलब्ध करणे. (प्रादेशिक पर्यटन विकास योजना) | रु.66,72,610/- | **मे. कुणाल संजय कदम**<br>मे. श्री इंटरप्रायझेस<br>मे. श्री गणेश इंटरप्रायझेस | **0.0100 % कमी दराने**<br>4.5000 % जास्त दराने<br>2.5000 % जास्त दराने |

**कार्यालयीन प्रस्तावना**

वरील कामी अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराच्या निविदा सादर केली आहे. मा.आयुक्त महोदय यांनी सदरचे दर स्विकारण्यास मान्यता दिलेली आहे. नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दि.26 ऑगस्ट 2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुद व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) मधील तरतुदीनुसार मा.आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असुन त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत. सदर अधिकारात वरील कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम 73 (क) नुसार प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ०७ दिनांक** ८/०७/२०२४

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील वरील कामास मान्यता देण्याच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452 (अ) च्या (1अ) व (1ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, संजय काटकर, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा.महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या विषयास

अनुसरुन खालील कामाच्या अंदाजपत्रकिय दरापेक्षा कमी दराच्या निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73 (क) नुसार मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र | टेंडर आय डी | कामाचे नाव | अंदाजित खर्च | निविदाधारकाचे नाव | सादर केलेला दर |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1. | 804768_1 | धारावी देवी धारावी मंदीर डोंगरी या ठिकाणी सुशोभिकरण व मुलभुत नागरी सुविधा उपलब्ध करणे. (प्रादेशिक पर्यटन विकास योजना) | रु.66,72,610/- | **मे. कुणाल संजय कदम**<br><br>मे. श्री इंटरप्रायझेस<br><br>मे. श्री गणेश इंटरप्रायझेस | **0.0100 % कमी दराने**<br><br>4.5000 % जास्त दराने<br><br>2.5000 % जास्त दराने |

वरील कामाबाबतची पुढील कार्यवाही नियमानुसार संबधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(संजय काटकर, भाप्रसे)
**प्रशासक तथा आयुक्त**
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रत बांधकाम विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना**

PC-8/23-24/DK/PT-3

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## प्रशासकीय ठरावासाठी गोषवारा

## // बांधकाम/ विद्युत विभाग //

दि. 08/07/2024

**प्रकरण क्रमांक. ( 08 )** मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विकास कामांचे त्रयस्थ लेखापरीक्षण (Third Party Audit) करणे कामाचे पॅनल नेमणे, इमारती, कॉक्रीट रस्ते प्रकल्प, उद्याने अंतर्गत सजावट, नाले प्रकल्प कांदळवन पार्क, रिव्हर फ्रंट, खाडी किनारा विकास, किल्ले, पुतळे, यांचे नकाशे तयार करणे, संरचनात्मक डीझाईन, अंदाजपत्रके तयार करणे व प्रकल्प व्यवस्थापनाचे कामाकरीता सी.आर.झेड. कांदळवन कक्ष, वन विभाग यांची मान्यता घेणेसाठी प्रस्ताव तयार करणे व मान्यता घेणे इ. साठी अनुभवी सल्लागार यांचे पॅनल नेमणे तसेच विविध मालमत्तेचे सन 2023-24, सन 2024-25 व सन 2025-26 पर्यंतचे मुल्यांकन करणेकामी सल्लागार नेमणुक करणे कामास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**1) विकास कामांचे त्रयस्थ लेखापरीक्षण (Third Party Audit) करणे कामाची पॅनल नेमणे.**

महानगरपालिका / नगरपालिका हद्दीत विविध प्रकारची विकास कामे करण्यात येत असतात. विकास कामांचा दर्जा अपेक्षित मानकाप्रमाणे नसणे, निकृष्ठ सामानाचा इ. वापर करणे अनेक तक्रारी प्राप्त होत असल्याने राज्यातील महानगरपालिका / नगरपालिका हद्दीत विकास कामांची त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण (Third Party Technical Audit) करणे संदर्भात नगरविकास विभागाने संकीर्ण 2008/1338/प्र.क्र.171/08 नवी-20 दि.02/03/2009 अन्वये शासन निर्णय पारीत केलेला आहे.

शासन निणर्यानुसार महानगरपालिका / नगरपालिकेने विकास कामांची गुणवत्ता / दर्जा तपासणी करीता जिल्हयातील अथवा क्षेत्रातील शासकिय अभियांत्रिकी / तंत्रज्ञान / वास्तुशास्त्र विद्यालय / शासकिय तंत्रनिकेतन अशा त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुन घेणेकामी संबंधित महाविद्यालयाच्या किंवा प्राचार्याशी संपर्क साधणे नमुद आहे. सदरील महाविद्यालय अथवा तंत्रनिकेतन संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुन घेणे काही कारणास्तव शक्य नसल्यास किंवा तांत्रिक लेखापरीक्षणसाठी पात्र कामाची संख्या मोठी असल्याने अधिक तांत्रिक लेखापरीक्षणाची गरज असल्याने त्या ठिकाणी महानगरपालिका / नगरपालिका निविदा प्रक्रियेमधुन सुयोग्य तांत्रिक संस्थाची / तज्ञ व्यक्तिची तांत्रिक लेखापरीक्षक म्हणुन नियुक्ती करता येईल असे नमुद केलेले आहे.

त्याचप्रमाणे शासन निणर्यातील नमुद तरतुदीनुसार विकास कामांचे त्रयस्थ लेखा परीक्षण (Third Party Audit) करणे बंधनकारक असल्यामुळे मिरा भाईंदर महानगरपालिका "ड" वर्गात येत असल्याने रु.50.00 लक्षापेक्षा अधिक किमतीची सर्व विकास कामे व सदर रकमेपेक्षा कमी दर्शविलेल्या कामाच्या संदर्भात Random पध्दतीने किमान 10% कामाचे त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण करुन घेणे बंधनकारक आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत बांधकाम/ विद्युत/ पाणी पुरवठा/ मल:निस्सारण/ उद्यान विभागामार्फत विविध विकास कामे सुरु असुन सदरील विकास कामांचा दर्जा व गुणवत्ता राखणेकरीता कामांचे त्रयस्थ संस्थेकडुन तांत्रिक लेखापरिक्षण (Third Party Audit) करुन घेणे बंधनकारक आहे. त्यानुसार विकास कामांचे त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण करण्याकरीता यापुर्वी निविदा मागविण्यात आली होती. त्यानुसार संबंधित त्रयस्थ संस्थेकडुन विकास कामांचे वेळोवेळी त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण केले जात आहे.

तथापी सदर कामाच्या निविदेची मुदत दि.11/08/2025 रोजी संपुष्टात येत असुन सदर कामाची नव्याने निविदा मागविण्यास प्रक्रिया सुरु करणे आवश्यक आहे.

महानगरपालिकेमार्फत पार पाडण्यात येणाऱ्या विकास कामांचे त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण करणेकरीता शासन निर्णयातील नमुद तरतुदीनुसार त्रयस्थ लेखा परीक्षण (Third Party Audit) करणे कामी खालील नमुद अटीशर्तीसह नव्याने निविदा मागविण असुन सदर कामाच्या अटीशर्तीचा तपशील खालील प्रमाणे आहे.

**Envelope No. 1 (Documents)**

| |
|---|
| Form Fee Receipt<br>**(Online Form fee Receipt - Scan Copy)** |
| Earnest Money Deposit Receipt<br>**(Online Earnest Money Deposit Receipt (Scan Copy))** |
| Balance Sheet of Last 3 Years.<br>**(C.A. certified copy of Balance sheet (Scan Copy).**<br>**(In Year of 2020-21, 2021-22, 2022-23)** |
| Persons who have Graduate / Post Graduation in Civil Engineering.<br>**(The certificate should be scanned.)** |
| Experience having the Third Party Technical Audit of 5 years in related to Govt./ Semi Govt. organization / Urban Local Body.<br>**(The work order and work completion certificate should be scanned.)** |
| Affidavit on stamp paper of Rs.100/- stating authenticity of the documents enclosed/uploaded while submission of the tender to be enclosed in envelope no.1.<br>**(Tenderer to submit an affidavit of Rs.100/- for non-submission of false documents (Scan Copy))** |
| The Bidder Shall not be Blacklisted in any other Government / semi government / corporation. The Bidder organization shall upload an undertaking<br>**(Submission of declaration letter by the tenderer regarding non-blacklisting. (Scan Copy))** |

**2) मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत इमारती, कॉंक्रीट रस्ते प्रकल्प, किल्ले, पुतळे, खाडी, रिव्हर फ्रंट, उद्याने अंतर्गत सजावट, नाले प्रकल्प यांचे नकाशे तयार करणे, संरचनात्मक डीझाईन, अंदाजपत्रके तयार करणे व प्रकल्प व्यवस्थापनाचे कामाकरीता अनुभवी सल्लागार यांचे पॅनल नेमणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या बांधकाम विभागामार्फत पार पाडण्यात येणाऱ्या

1) विविध इमारतीच्या कामांचे नकाशे तयार करणे, नकाशांना नगररचना विभागाकडून बांधकाम परवानगी घेणे. कामाचे अंदाजपत्रक तयार करणे.

2) कॉंक्रीट रस्त्यांसाठी सर्वेक्षण करुन रस्त्याचे डीझाईन तयार करणे आयआयटी, व्ही.जे.टी.आय अथवा इतर सक्षम संस्थेकडून तपासणी करुन घेणे, कामाचे अंदाजपत्रक तयार करणे.

3) विविध उद्याने विकसित करण्यासाठी उद्यानाचा नकाशा तयार करुन अंदाजपत्रक तयार करणे.

4) विविध इमारतीमधील अंतर्गत सजावटीची कामे करण्यासाठी नकाशे तयार करणे, अंदाजपत्रके तयार करणे इत्यादी कामासाठी महानगरपालिकेकडे कनिष्ठ अभियंते अत्यंत अपुरे असल्याने व सदर कामे ही विशिष्ट स्वरुपाची असल्याने सदर कामे ही सल्लागार नेमून त्यांच्यामार्फत करुन घेण्यात येत असतात. सद्यस्थितीत असलेल्या पॅनलची तीन वर्षाची मुदत ही दि.19/01/2025 रोजी संपत असल्याने तत्पूर्वी नव्याने ई - निविदा मागवून पॅनल तयार करावा लागणार आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील सामाजिक स्वरुपाच्या इमारत बांधणे, कम्युनिटी हॉल बांधणे, विविध प्रकारची सामाजीक भवन बांधणे, क्रीडा संकुल बांधणे, तलाव सुशोभिकरण, स्मशानभुमी विकसित करणे, चौपाटी विकसित करणे इ. स्ट्रक्चरल बांधकाम करणे. इ. कामाकरीता शासनाकडून विशेष निधी स्वरुपात प्राप्त होत असतो. त्यानुसार सदरची कामे करण्याकरीता निविदा मागविल्या जातात. त्याअनुषंगाने सदरची कामे दर्जेदार, गुणवत्तापुर्वक व तांत्रिकदृष्टया योग्य होण्याच्या दृष्टीने तांत्रिक मार्गदर्शनाची आवश्यकता असते. संरचनात्मक डिझाईन तयार करणे, अंदाजपत्रक तयार करणे व प्रकल्प व्यवस्थापनाचे काम करण्याकरीता अनुभवी तांत्रिक सल्लागार महानगरपालिकेकडे सद्यस्थितीत उपलब्ध नसल्याने सदर कामे तांत्रिकदृष्टया उत्तम दर्जाची होण्याच्या दृष्टीने निविदा मागवुन तांत्रिक सल्लागाराचे पॅनल तयार करणे आवश्यक आहे.

राज्य शासन नगरविकास विभागाने शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2018/प्र.क्र.54/नवि-16 दि.4 जून 2018 अन्वये सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क व त्याच्या प्रदानाबाबत मार्गदर्शक सुचना निर्गमित केल्या असुन त्यानुसार राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थानी विविध प्रकल्पाचे / कामाचे डीपीआर तयार करणे व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यासाठी शुल्काचे दर व टप्पे केले आहेत. त्यानुसार महानगरपालिकेतील सर्व कामासाठी 2% एवढे

सल्लागार शुल्क टप्प्याटप्प्याने अदा करावयाचे आहेत. सदर सल्लागार यांच्यावर होणारा खर्च हा त्या कामाच्या अंदाजपत्रकात धरुन वेळोवेळी अदा करण्यात येत असतो.

| अ.क्र. | प्रकल्पाच्या / कामाच्या प्रगतीचा टप्पा | नागरी स्थानिक इतर सर्व कामासाठी (प्रकल्प किंमतीच्या प्रमाणात) |
|---|---|---|
| 1 | प्रकल्पाचे प्रशासकिय मान्यतेचे आदेश निर्गमित झाल्यानंतर | 0.50 (डीपीआर 0.33% + प्रमा - 0.17%) |
| 2 | प्रकल्पातील कामाचे कार्यादेश दिल्यानंतर | 0.16 % |
| 3 | प्रकल्पाचे 25 टक्के काम पूर्ण झाल्यानंतर | 0.27 % |
| 4 | प्रकल्पाचे 50 टक्के काम पूर्ण झाल्यानंतर | 0.27 % |
| 5 | प्रकल्पाचे 75 टक्के काम पूर्ण झाल्यानंतर | 0.40 % |
| 6 | प्रकल्पाचे 100 टक्के काम पूर्ण झाल्यानंतर | 0.40 % |
| | एकूण | 2.00 % |

वरीलप्रमाणे अधिकतम दर निश्चित आहेत. सदर कामासाठी अनुभवी सल्लागार यांचे पॅनल तयार करणे आवश्यक आहे. वास्तुविशारदामार्फत नकाशे तयार करणेसाठी नकाशा मंजुरीचे अंदाजपत्रकिय दरावर दर मागवावे लागणार आहेत.

सदर निविदेकरीता समाविष्ठ करावयाच्या लिफाफा क्र.1 मधिल अटीशर्तीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**Envelop No. 1 Technical Eligibility Criteria:**

| | |
|---|---|
| 1 | **Companies Registration:-** Company Act, 1956 OR a partnership firm registered under LLp Act, 2008 in India and should have been in existence since the last 3 years in India. |
| 2 | **Turnover:-** The bidder should have minimum average annual turnover of INR. One Cr. in last three financial years<br>(Year **2020-21, 2021-22, 2022-23**)<br>By- C.A. certify copy. |
| 3 | **Registration:-** The bidder must have a currently valid GST registration certificate and PAN number |
| 4 | **Form Fee & EMD :-** The CONSULTANT shall deposit processing fee of Rs.50,000/- and cost of the tender From Fee Rs.5000 + 18% GST( 900)= 5900/- at the time of submission of bids in the shape of online payment by Consultants bank accounts only in favor of Executive Engineer, Public Work Department, Mira Bhaindar Municipal Corporation, which will be non-refundable. |
| 5 | **Work Experience :-**<br>The CONSULTANT, as sole entity or as Consortium, must:<br>i) Have an established and demonstrable.<br>i) Track record of rendering all of the following services: Building(Architectural/ structural) design, Project management consultancy for a project comparable to than envisaged in the RFP; and |

| | |
|---|---|
| | ii) Have experience in designing and executing in concrete road projects<br>iii) Have experience and capacity to engage and co-ordinate a multi-disciplinary team of expert for designing, executing, equipping commissioning of Garden & Landscaping infrastructure projects.<br>iv) Have experience in designing and executing of drainage systems & pavements & Statues<br>Should possess and can display capacity for transfer of knowledge/skills for capacity development in best practices in operating the services under the project and maintenance of the project after its completion. |
| 6 | **Company Profile Document.** |
| 7 | Affidavit on stamp paper of Rs.100/- stating authenticity of the documents enclosed/uploaded while submission of the tender to be enclosed in envelope no.1.<br>**(Tenderer to submit an affidavit of Rs.100/- for non-submission of false documents (Scan Copy))** |
| 8 | The Bidder Shall not be Blacklisted in any other Government / semi government / corporation. The Bidder organization shall upload an undertaking<br>**(Submission of declaration letter by the tenderer regarding non-blacklisting. (Scan Copy))** |

**3) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध मालमत्तेचे सन 2023-24, सन 2024-25 व सन 2025-26 पर्यंतचे मुल्यांकन करणेकामी सल्लागार नेमणुक करणे कामाची निविदा प्रसिध्द करणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतल विविध मालमतेचे मुल्यांकन करणे कामी मे. पाडळीकर कंन्सल्टंट यांची कंन्सल्टंट म्हणुन नेमणुक करण्यात आलेली आहे. सल्लागार मे. पाडळीकर कंन्सल्टंट यांनी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध मालमत्ता उदा. डांबरी रस्ते, सिमेंट कॉंक्रीट रस्ते, पायवाटा, गटारे, बाग, बगीचे, खेळाचे मैदान, मोकळया जागा, शाळा, व्यायाम शाळा, कार्यालये, समाज मंदिरे, स्मशानभुमी, दफनभुमी, पाण्याच्या टाक्या, अग्निशमन केंद्र तसेच आरक्षित जागा, नगररचना विभागाकडुन प्राप्त झालेले भुखंड, फ्लॅट्स, शॉप्स व इतर बांधकाम, मालमत्ता, इ. कामांचे घसारा करुन दि.01 एप्रिल 2007 पासुन दि.31 मार्च 2023 पर्यंत मालमत्तांचे मुल्यांकन करण्याचे काम देण्यात आलेले आहे. सदरील कामी मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील विविध मालमत्तांच्या जागेवर जाऊन सर्व्हे करणे, मोजमाप घेणे, घसारा काढुन मुल्यांकन अहवाल तयार करणे कामी प्रति वर्षी मे.पाडळीकर कंन्सल्टंट यांना रु.19,28,570/- एवढा दर मंजुर करण्यात आला आहे.

मे. पाडळीकर कंन्सल्टंट यांनी मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील विविध मालमत्तांचे Ready Reckoner मधील नियमावली व Value Zone प्रमाणे दर घेवुन सन 2020-21 पर्यंतचे मुल्यांकन अहवाल सादर केलेला असुन सन 2021-22 व सन 2022-23 या वर्षाचा मुल्यांकन अहवाल पुढील 2 महिन्यात सादर

करण्यात येणार आहे. मे.पाडळीकर कंन्सल्टंट यांची मुदत संपुष्टात आल्याने मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील विविध मालमत्तांची सन 2023-24, सन 2024-25 व सन 2025-26 पर्यंत मुल्यांकन करणेकामी नव्याने अनुभवी सल्लागार नेमणुक करण्याची आवश्यकता आहे. सदरील कामी नव्याने ई-निविदा मागवावयाची असुन सदर कामाच्या अटीशर्तीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**Envelope No.1 (Documents)**

| | |
|---|---|
| 1) | Form Fee Receipt<br>**(Online Form fee Receipt - Scan Copy)** |
| 2) | Earnest Money Deposit Receipt<br>**(Online Earnest Money Deposit Receipt (Scan Copy))** |
| 3) | Balance Sheet of Last 3 Years.<br>**(C.A. certified copy of Balance sheet (Scan Copy).**<br>**(In Year of 2020-21, 2021-22, 2022-23)** |
| 4) | Income through valuation work shall not be less than 10 Lac in last year. |
| 5) | He should be registered under section 34A-B of wealth tax with Income tax department. |
| 6) | Degree Certificate of Civil Engineer or Architecture, along with registration with The Institution of Engineers (India) or Member of Council of Architecture. |
| 7) | He should be Fellow of The Institution of Valuers (Kolkata). |
| 8) | Should have completed at least one assignment where the valued amount of asset is not less than 500 Cr of Valuation in last three years. |
| 9) | List of completed works in government/semi-government/Private Organization as a Valuer. |
| 10) | List of Technical Personnel etc. |

**4) सी.आर.झेड, कांदळवन कक्ष, वन विभाग, पुरातत्व विभाग, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, विविध पुतळे यांच्या देखिल विविध प्रकल्पासाठी मान्यता घ्याव्या लागतात. त्याकामी महानगरपालिकेचे निविदा प्रक्रीया करून पॅनल तयार करावयाचे आहे. जेणे करून सदर कामे तातडीने पुर्ण करता येतील.**

वरील सर्व कामे करण्यासाठी ई निविदा प्रक्रीया करून पॅनल तयार करावयाचे असून आवश्यकतेनूसार संबधित विभागामार्फत कामाचे स्वतंत्र आदेश देण्यात येतात. तसेच अर्थसंकल्पात सदर कामांच्या खर्चासाठी विविध लेखाशिर्षाखाली तरतुद करण्यात येऊन त्यामधून देयके प्रदान करण्यात येत असतात.

तरी प्रस्तावित कामांसाठी प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेस व ई निविदा प्रक्रीया करण्यास प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देणेस शिफारस आहे.

**(दिपक खांबित)**
**शहर अभियंता**
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने**

मा. महासभा / स्थायी समिती सभा

PC-05/DK/24-25/MG-5

सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव ०८ दिनांक :- ०८/०८/२०२४

**प्रकरण क्रमांक :- ( ०८ )** मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विकास कामांचे त्रयस्थ लेखापरीक्षण (Third Party Audit) करणे कामाचे पॅनल नेमणे, इमारती, कॉक्रीट रस्ते प्रकल्प, उद्याने अंतर्गत सजावट, नाले प्रकल्प कांदळवन पार्क, रिव्हर फ्रंट, खाडी किनारा विकास, किल्ले, पुतळे, यांचे नकाशे तयार करणे, संरचनात्मक डीझाईन, अंदाजपत्रके तयार करणे व प्रकल्प व्यवस्थापनाचे कामाकरीता सी.आर.झेड. कांदळवन कक्ष, वन विभाग यांची मान्यता घेणेसाठी प्रस्ताव तयार करणे व मान्यता घेणे इ. साठी अनुभवी सल्लागार यांचे पॅनल नेमणे तसेच विविध मालमत्तेचे सन 2023-24, सन 2024-25 व सन 2025-26 पर्यंतचे मुल्यांकन करणेकामी सल्लागार नेमणुक करणे कामास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

## कार्यालयीन प्रस्तावना

**1) विकास कामांचे त्रयस्थ लेखापरीक्षण (Third Party Audit) करणे कामाची पॅनल नेमणे.**

महानगरपालिका / नगरपालिका हद्दीत विविध प्रकारची विकास कामे करण्यात येत असतात. विकास कामांचा दर्जा अपेक्षित मानकाप्रमाणे नसणे, निकृष्ठ सामानाचा इ. वापर करणे अनेक तक्रारी प्राप्त होत असल्याने राज्यातील महानगरपालिका / नगरपालिका हद्दीत विकास कामांची त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण (Third Party Technical Audit) करणे संदर्भात नगरविकास विभागाने संकीर्ण 2008/1338/प्र.क्र.171/08 नवी-20 दि.02/03/2009 अन्वये शासन निर्णय पारीत केलेला आहे.

शासन निणर्यानुसार महानगरपालिका / नगरपालिकेने विकास कामांची गुणवत्ता / दर्जा तपासणी करीता जिल्हयातील अथवा क्षेत्रातील शासकिय अभियांत्रिकी / तंत्रज्ञान / वास्तुशास्त्र विद्यालय / शासकिय तंत्रनिकेतन अशा त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुन घेणेकामी संबंधित महाविद्यालयाच्या किंवा प्राचार्याशी संपर्क साधणे नमुद आहे. सदरील महाविद्यालय अथवा तंत्रनिकेतन संस्थेकडून तांत्रिक लेखापरीक्षण करुन घेणे काही कारणास्तव शक्य नसल्यास किंवा तांत्रिक लेखापरीक्षणसाठी पात्र कामाची संख्या मोठी असल्याने अधिक तांत्रिक लेखापरीक्षणाची गरज असल्याने त्या ठिकाणी महानगरपालिका / नगरपालिका निविदा प्रक्रियेमधुन सुयोग्य तांत्रिक संस्थाची / तज्ञ व्यक्तिीची तांत्रिक लेखापरीक्षक म्हणुन नियुक्ती करता येईल असे नमुद केलेले आहे.

त्याचप्रमाणे शासन निणर्यातील नमुद तरतुदीनुसार विकास कामांचे त्रयस्थ लेखा परीक्षण (Third Party Audit) करणे बंधनकारक असल्यामुळे मिरा भाईंदर महानगरपालिका "ड" वर्गात येत असल्याने रु.50.00 लक्षापेक्षा अधिक किमतीची सर्व विकास कामे व सदर रकमेपेक्षा कमी दर्शविलेल्या कामाच्या संदर्भात Random पध्दतीने किमान 10% कामाचे त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण करुन घेणे बंधनकारक आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत बांधकाम/ विद्युत/ पाणी पुरवठा/ मल:निस्सारण/ उद्यान विभागामार्फत

विविध विकास कामे सुरु असुन सदरील विकास कामांचा दर्जा व गुणवत्ता राखणेकरीता कामांचे त्रयस्थ संस्थेकडुन तांत्रिक लेखापरिक्षण (Third Party Audit) करुन घेणे बंधनकारक आहे. त्यानुसार विकास कामांचे त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण करण्याकरीता यापुर्वी निविदा मागविण्यात आली होती. त्यानुसार संबंधित त्रयस्थ संस्थेकडुन विकास कामांचे वेळोवेळी त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण केले जात आहे.

तथापी सदर कामाच्या निविदेची मुदत दि.11/08/2025 रोजी संपुष्टात येत असुन सदर कामाची नव्याने निविदा मागविण्यास प्रक्रिया सुरु करणे आवश्यक आहे.

महानगरपालिकेमार्फत पार पाडण्यात येणाऱ्या विकास कामांचे त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण करणेकरीता शासन निर्णयातील नमुद तरतुदीनुसार त्रयस्थ लेखा परीक्षण (Third Party Audit) करणे कामी खालील नमुद अटीशर्तीसह नव्याने निविदा मागविण असुन सदर कामाच्या अटीशर्तीचा तपशील खालील प्रमाणे आहे.

**Envelope No. 1 (Documents)**

| |
|---|
| Form Fee Receipt<br>**(Online Form fee Receipt - Scan Copy)** |
| Earnest Money Deposit Receipt<br>**(Online Earnest Money Deposit Receipt (Scan Copy))** |
| Balance Sheet of Last 3 Years.<br>**(C.A. certified copy of Balance sheet (Scan Copy).**<br>**(In Year of 2020-21, 2021-22, 2022-23)** |
| Persons who have Graduate / Post Graduation in Civil Engineering.<br>**(The certificate should be scanned.)** |
| Experience having the Third Party Technical Audit of 5 years in related to Govt./ Semi Govt. organization / Urban Local Body.<br>**(The work order and work completion certificate should be scanned.)** |
| Affidavit on stamp paper of Rs.100/- stating authenticity of the documents enclosed/uploaded while submission of the tender to be enclosed in envelope no.1.<br>**(Tenderer to submit an affidavit of Rs.100/- for non-submission of false documents (Scan Copy))** |
| The Bidder Shall not be Blacklisted in any other Government / semi government / corporation. The Bidder organization shall upload an undertaking<br>**(Submission of declaration letter by the tenderer regarding non-blacklisting. (Scan Copy))** |

2) **मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत इमारती, कॉंक्रीट रस्ते प्रकल्प, किल्ले, पुतळे, खाडी, रिव्हर फ्रंट, उद्याने अंतर्गत सजावट, नाले प्रकल्प यांचे नकाशे तयार करणे, संरचनात्मक डीझाईन, अंदाजपत्रके तयार करणे व प्रकल्प व्यवस्थापनाचे कामाकरीता अनुभवी सल्लागार यांचे पॅनल नेमणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या बांधकाम विभागामार्फत पार पाडण्यात येणाऱ्या

1) विविध इमारतीच्या कामांचे नकाशे तयार करणे, नकाशांना नगररचना विभागाकडून बांधकाम परवानगी घेणे. कामाचे अंदाजपत्रक तयार करणे.

2) कॉंक्रीट रस्त्यांसाठी सर्वेक्षण करुन रस्त्याचे डीझाईन तयार करणे आयआयटी, व्ही.जे.टी.आय अथवा इतर सक्षम संस्थेकडून तपासणी करुन घेणे, कामाचे अंदाजपत्रक तयार करणे.

3) विविध उद्याने विकसित करण्यासाठी उद्यानाचा नकाशा तयार करुन अंदाजपत्रक तयार करणे.

4) विविध इमारतीमधील अंतर्गत सजावटीची कामे करण्यासाठी नकाशे तयार करणे, अंदाजपत्रके तयार करणे इत्यादी कामासाठी महानगरपालिकेकडे कनिष्ठ अभियंते अत्यंत अपुरे असल्याने व सदर कामे ही विशिष्ट स्वरुपाची असल्याने सदर कामे ही सल्लागार नेमून त्यांच्यामार्फत करुन घेण्यात येत असतात. सद्यस्थितीत असलेल्या पॅनलची तीन वर्षाची मुदत ही दि.19/01/2025 रोजी संपत असल्याने तत्पूर्वी नव्याने ई - निविदा मागवून पॅनल तयार करावा लागणार आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील सामाजिक स्वरुपाच्या इमारत बांधणे, कम्युनिटी हॉल बांधणे, विविध प्रकारची सामाजीक भवन बांधणे, क्रीडा संकुल बांधणे, तलाव सुशोभिकरण, स्मशानभुमी विकसित करणे, चौपाटी विकसित करणे इ. स्ट्रक्चरल बांधकाम करणे. इ. कामाकरीता शासनाकडून विशेष निधी स्वरुपात प्राप्त होत असतो. त्यानुसार सदरची कामे करण्याकरीता निविदा मागविल्या जातात. त्याअनुषंगाने सदरची कामे दर्जेदार, गुणवत्तापुर्वक व तांत्रिकदृष्टया योग्य होण्याच्या दृष्टीने तांत्रिक मार्गदर्शनाची आवश्यकता असते. संरचनात्मक डिझाईन तयार करणे, अंदाजपत्रक तयार करणे व प्रकल्प व्यवस्थापनाचे काम करण्याकरीता अनुभवी तांत्रिक सल्लागार महानगरपालिकेकडे सद्यस्थितीत उपलब्ध नसल्याने सदर कामे तांत्रिकदृष्टया उत्तम दर्जाची होण्याच्या दृष्टीने निविदा मागवुन तांत्रिक सल्लागाराचे पॅनल तयार करणे आवश्यक आहे.

राज्य शासन नगरविकास विभागाने शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2018/प्र.क्र.54/नवि-16 दि.4 जून 2018 अन्वये सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क व त्याच्या प्रदानाबाबत मार्गदर्शक सुचना निर्गमित केल्या असुन त्यानुसार राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थानी विविध प्रकल्पाचे / कामाचे डीपीआर तयार करणे व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यासाठी शुल्काचे दर व टप्पे केले आहेत. त्यानुसार महानगरपालिकेतील सर्व कामासाठी 2% एवढे सल्लागार शुल्क टप्प्याटप्प्याने अदा करावयाचे आहेत. सदर सल्लागार यांच्यावर होणारा खर्च हा त्या कामाच्या अंदाजपत्रकात धरुन वेळोवेळी अदा करण्यात येत असतो.

| **अ.क्र.** | **प्रकल्पाच्या / कामाच्या प्रगतीचा टप्पा** | **नागरी स्थानिक इतर सर्व कामासाठी (प्रकल्प किंमतीच्या प्रमाणात)** |
|---|---|---|
| 1 | प्रकल्पाचे प्रशासकिय मान्यतेचे आदेश निर्गमित झाल्यानंतर | 0.50 (डीपीआर 0.33% + प्रमा - 0.17%) |
| 2 | प्रकल्पातील कामाचे कार्यादेश दिल्यानंतर | 0.16 % |
| 3 | प्रकल्पाचे 25 टक्के काम पूर्ण झाल्यानंतर | 0.27 % |
| 4 | प्रकल्पाचे 50 टक्के काम पूर्ण झाल्यानंतर | 0.27 % |

| | | |
|---|---|---|
| 5 | प्रकल्पाचे 75 टक्के काम पूर्ण झाल्यानंतर | 0.40 % |
| 6 | प्रकल्पाचे 100 टक्के काम पूर्ण झाल्यानंतर | 0.40 % |
| | एकूण | 2.00 % |

वरीलप्रमाणे अधिकतम दर निश्चित आहेत. सदर कामासाठी अनुभवी सल्लागार यांचे पॅनल तयार करणे आवश्यक आहे. वास्तुविशारदामार्फत नकाशे तयार करणेसाठी नकाशा मंजुरीचे अंदाजपत्रकिय दरावर दर मागवावे लागणार आहेत.

सदर निविदेकरीता समाविष्ठ करावयाच्या लिफाफा क्र.1 मधिल अटीशर्तींचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**Envelop No. 1 Technical Eligibility Criteria:**

| | |
|---|---|
| 1 | **Companies Registration:-** Company Act, 1956 OR a partnership firm registered under LLp Act, 2008 in India and should have been in existence since the last 3 years in India. |
| 2 | **Turnover:-** The bidder should have minimum average annual turnover of INR. One Cr. in last three financial years<br>(Year **2020-21, 2021-22, 2022-23**)<br>By- C.A. certify copy. |
| 3 | **Registration:-** The bidder must have a currently valid GST registration certificate and PAN number |
| 4 | **Form Fee & EMD :-** The CONSULTANT shall deposit processing fee of Rs.50,000/- and cost of the tender From Fee Rs.5000 + 18% GST( 900)= 5900/- at the time of submission of bids in the shape of online payment by Consultants bank accounts only in favor of Executive Engineer, Public Work Department, Mira Bhaindar Municipal Corporation, which will be non-refundable. |
| 5 | **Work Experience :-**<br>The CONSULTANT, as sole entity or as Consortium, must:<br>i) Have an established and demonstrable.<br>i) Track record of rendering all of the following services: Building(Architectural/ structural) design, Project management consultancy for a project comparable to than envisaged in the RFP; and<br>ii) Have experience in designing and executing in concrete road projects<br>iii) Have experience and capacity to engage and co-ordinate a multi-disciplinary team of expert for designing, executing, equipping commissioning of Garden & Landscaping infrastructure projects.<br>iv) Have experience in designing and executing of drainage systems & pavements & Statues<br>Should possess and can display capacity for transfer of knowledge/skills for capacity development in best practices in operating the services under the project and maintenance of the project after its completion. |
| 6 | **Company Profile Document.** |
| 7 | Affidavit on stamp paper of Rs.100/- stating authenticity of the documents |

| | |
|---|---|
| | enclosed/uploaded while submission of the tender to be enclosed in envelope no.1. **(Tenderer to submit an affidavit of Rs.100/- for non-submission of false documents (Scan Copy))** |
| 8 | The Bidder Shall not be Blacklisted in any other Government / semi government / corporation. The Bidder organization shall upload an undertaking **(Submission of declaration letter by the tenderer regarding non-blacklisting. (Scan Copy))** |

**3) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध मालमत्तेचे सन 2023-24, सन 2024-25 व सन 2025-26 पर्यंतचे मुल्याकंन करणेकामी सल्लागार नेमणुक करणे कामाची निविदा प्रसिध्द करणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतल विविध मालमत्तेचे मुल्यांकन करणे कामी मे. पाडळीकर कंन्सल्टंट यांची कंन्सल्टंट म्हणुन नेमणुक करण्यात आलेली आहे. सल्लागार मे. पाडळीकर कंन्सल्टंट यांनी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध मालमत्ता उदा. डांबरी रस्ते, सिमेंट कॉंक्रीट रस्ते, पायवाटा, गटारे, बाग, बगीचे, खेळाचे मैदान, मोकळया जागा, शाळा, व्यायाम शाळा, कार्यालये, समाज मंदिरे, स्मशानभुमी, दफनभुमी, पाण्याच्या टाक्या, अग्निशमन केंद्र तसेच आरक्षित जागा, नगररचना विभागाकडुन प्राप्त झालेले भुखंड, फ्लॅट्स, शॉप्स व इतर बांधकाम, मालमत्ता, इ. कामांचे घसारा करुन दि.01 एप्रिल 2007 पासुन दि.31 मार्च 2023 पर्यंत मालमत्तांचे मुल्यांकन करण्याचे काम देण्यात आलेले आहे. सदरील कामी मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील विविध मालमत्तांच्या जागेवर जाऊन सर्व्हे करणे, मोजमाप घेणे, घसारा काढुन मुल्यांकन अहवाल तयार करणे कामी प्रति वर्षी मे.पाडळीकर कंन्सल्टंट यांना रु.19,28,570/- एवढा दर मंजुर करण्यात आला आहे.

मे. पाडळीकर कंन्सल्टंट यांनी मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील विविध मालमत्तांचे Ready Reckoner मधील नियमावली व Value Zone प्रमाणे दर घेवुन सन 2020-21 पर्यंतचे मुल्यांकन अहवाल सादर केलेला असुन सन 2021-22 व सन 2022-23 या वर्षाचा मुल्यांकन अहवाल पुढील 2 महिन्यात सादर करण्यात येणार आहे. मे.पाडळीकर कंन्सल्टंट यांची मुदत संपुष्टात आल्याने मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील विविध मालमत्तांची सन 2023-24, सन 2024-25 व सन 2025-26 पर्यंत मुल्यांकन करणेकामी नव्याने अनुभवी सल्लागार नेमणुक करण्याची आवश्यकता आहे. सदरील कामी नव्याने ई-निविदा मागवावयाची असुन सदर कामाच्या अटीशर्तीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**Envelope No.1 (Documents)**

| | |
|---|---|
| 1) | Form Fee Receipt<br>**(Online Form fee Receipt - Scan Copy)** |
| 2) | Earnest Money Deposit Receipt<br>**(Online Earnest Money Deposit Receipt (Scan Copy))** |
| 3) | Balance Sheet of Last 3 Years.<br>**(C.A. certified copy of Balance sheet (Scan Copy).**<br>**(In Year of 2020-21, 2021-22, 2022-23)** |

| | |
|---|---|
| 4) | Income through valuation work shall not be less than 10 Lac in last year. |
| 5) | He should be registered under section 34A-B of wealth tax with Income tax department. |
| 6) | Degree Certificate of Civil Engineer or Architecture, along with registration with The Institution of Engineers (India) or Member of Council of Architecture. |
| 7) | He should be Fellow of The Institution of Valuers (Kolkata). |
| 8) | Should have completed at least one assignment where the valued amount of asset is not less than 500 Cr of Valuation in last three years. |
| 9) | List of completed works in government/semi-government/Private Organization as a Valuer. |
| 10) | List of Technical Personnel etc. |

**4) सी.आर.झेड, कांदळवन कक्ष, वन विभाग, पुरातत्व विभाग, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, विविध पुतळे यांच्या देखिल विविध प्रकल्पासाठी मान्यता घ्याव्या लागतात. त्याकामी महानगरपालिकेचे निविदा प्रक्रीया करून पॅनल तयार करावयाचे आहे. जेणे करून सदर कामे तातडीने पुर्ण करता येतील.**

वरील सर्व कामे करण्यासाठी ई निविदा प्रक्रीया करून पॅनल तयार करावयाचे असून आवश्यकतेनूसार संबधित विभागामार्फत कामाचे स्वतंत्र आदेश देण्यात येतात. तसेच अर्थसंकल्पात सदर कामांच्या खर्चासाठी विविध लेखाशिर्षाखाली तरतुद करण्यात येऊन त्यामधून देयके प्रदान करण्यात येत असतात. तरी प्रस्तावित कामांसाठी प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेस व ई निविदा प्रक्रीया करण्यास मान्यता देणेबाबत प्रशासनाचा प्रस्ताव आहे.

## प्रशासकीय ठराव क्र. ०८ दिनांक ६ /०६ /2024

वरील प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452 (अ) च्या (1अ) व (1ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2)/ नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, श्री. संजय काटकर, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केल्यानूसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विकास कामांचे त्रयस्थ लेखापरीक्षण (Third Party Audit) करणे कामाचे पॅनल नेमणे, इमारती, कॉक्रीट रस्ते प्रकल्प, उद्याने अंतर्गत सजावट, नाले प्रकल्प कांदळवन पार्क, रिव्हर फ्रंट, खाडी किनारा विकास, किल्ले, पुतळे, यांचे नकाशे तयार करणे, संरचनात्मक डीझाईन, अंदाजपत्रके तयार करणे व प्रकल्प व्यवस्थापनाचे कामाकरीता सी.आर.झेड. कांदळवन कक्ष, वन विभाग यांची मान्यता घेणेसाठी प्रस्ताव तयार करणे व मान्यता घेणे इ. साठी अनुभवी सल्लागार यांचे पॅनल नेमणे तसेच विविध मालमतेचे सन 2023-24, सन 2024-25 व सन 2025-26 पर्यंतचे मुल्याकंन करणेकामी सल्लागार नेमणुक करणे कामास या ठरावाव्दारे प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

सदर कामाबाबतची पुढील कार्यवाही नियमानुसार संबधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(संजय काटकर, भाप्रसे)
**प्रशासक तथा आयुक्त**
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रत :- बांधकाम/ विद्युत विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना**

PC-05/DK/24-25/MT-1

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## बांधकाम विभाग

//गोषवारा // दि. ०९/०७/२०२४

**प्रकरण क्र. ( ०९ )** :- राज्य शासनाच्या नगरविकास विभागाकडील "महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास विकासासाठी विशेष तरतुद" योजनेंतर्गत निधी विकास करण्यासाठी मान्यता दिलेली विकास कामे करण्यास मान्यता देणे.

राज्य शासनाच्या नगर विकास विभागाकडील "महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास विकासासाठी विशेष तरतुद" या योजनेतंर्गत खालील कामांसाठी निधी वितरीत करण्यास शासन शुद्धीपत्रक क्र. मनपा-2022//प्र.क्र.174(43-अ)/नवि-16,दि. 20 जून, 2024 अन्वये मंजूरी देण्यात आली आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम रुपये | शासन हिस्सा | मनपा हिस्सा |
|---|---|---|---|---|
| 1. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उत्तन येथील रॉयल इंग्लिश स्कुल ते धावगीकडे जागारा रस्ता तयार करणे. | रु. 85,00,000/- | रु. 85,00,000/- | - |
| 2. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पूर्व) प्रभाग क्र. 22 मधील आरक्षण क्र. 184 मिरारोड स्टेशन पार्किंग मधील नाल्याची पूर्नबांधणी करणे व परिसरात लादीकरण करणे. | रु. 85,00,000/- | रु. 85,00,000/- | - |
| | एकुण | **रु.1,70,00,000/-** | **रु.1,70,00,000/-** | - |

वरील कामासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेचा हिस्सा राहणार नसून सदर खर्च महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पना तरतूद करुन करावा लागणार नाही. **रु.170.00 लक्ष** निधी शासनाकडून प्राप्त होणार आहे. सदर कामे करण्यास मान्यता देणेस व कामाची अंदाजपत्रके प्रस्तावासह प्रशासकीय मान्यतेसाठी मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांचे कडे पाठविणेस मान्यता देणे आवश्यक आहे.

नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-2020/ प्र.क्र.71(भाग-21)/नवि-14 दि.26 ऑगस्ट 2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतूद व विशेषत: कलम 452 अ चा (1अ) व (1ब) मधील तरतूदीनुसार मा.आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असून त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत.

तरी सदर प्राप्त अधिकारात वरील नमुद प्रस्तावास मान्यता देणेस शिफारस आहे.

**(दिपक खांबित)**
**शहर अभियंता**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने**

PC12/2024-25/गोषवारा

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव क्र. ०९ दिनांक ९/०७/2024

**विषय क्र. ( ९ ) :-** मा. आयुक्त महोदयाकडील कामकाज
राज्य शासनाच्या नगरविकास विभागाकडील "महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास विकासासाठी विशेष तरतुद" योजनेंतर्गत निधी विकास करण्यासाठी मान्यता दिलेली विकास कामे करण्यास मान्यता देणे.

## कार्यालयीन प्रस्तावना

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात "महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास विकासासाठी विशेष तरतुद" या योजनेतंर्गत खालील कामांसाठी निधी वितरीत करण्यास शासन शुद्धीपत्रक क्र. मनपा-2022//प्र.क्र.174(43-अ)/नवि-16,दि. 20 जून, 2024 अन्वये खालील कामांना मंजूरी देण्यात आली आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम रुपये | शासन हिस्सा | मनपा हिस्सा |
|---|---|---|---|---|
| 1. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उत्तन येथील रॉयल इंग्लिश स्कुल ते धावगीकडे जागारा रस्ता तयार करणे. | रु. 85,00,000/- | रु. 85,00,000/- | - |
| 2. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पूर्व) प्रभाग क्र. 22 मधील आरक्षण क्र. 184 मिरारोड स्टेशन पार्किग मधील नाल्याची पूर्नबांधणी करणे व परिसरात लादीकरण करणे. | रु. 85,00,000/- | रु. 85,00,000/- | - |
| | **एकुण** | **रु.1,70,00,000/-** | **रु.1,70,00,000/-** | - |

वरील कामासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेचा हिस्सा राहणार नसून सदर खर्च महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पना तरतूद करुन करावा लागणार नाही. रु. 170.00 लक्ष निधी शासनाकडून प्राप्त होणार आहे. सदर कामे करण्यास मान्यता देणेस व कामाची अंदाजपत्रके प्रस्तावासह प्रशासकीय मान्यतेसाठी मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांचे कडे पाठविणेस मान्यता देणे आवश्यक आहे.

नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-2020/ प्र.क्र.71(भाग-21)/नवि-14 दि.26 ऑगस्ट 2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतूद व विशेषत: कलम 452 अ चा (1अ) व (1ब) मधील तरतूदीनुसार मा.आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असून त्यांना

अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत. सदर कामे करण्यास मान्यता देणेस व कामाची अंदाजपत्रके प्रस्तावासह प्रशासकीय मान्यतेसाठी मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांचे कडे पाठविणेस मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ०८ दिनांक ८ /०५/2024**

राज्य शासनाच्या नगरविकास विभागाकडील "महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयीसुविधांचा विकास" योजनेंतर्गत निधी विकास करण्यासाठी मान्यता दिलेली विकास कामे करण्यास मान्यता देणे. या कामाच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452 (अ) च्या (1अ) व (1ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, संजय काटकर, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या अनुसरुन खालील कामांच्या अंदाजपत्रीकेच्या खर्चात मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम रुपये | शासन हिस्सा | मनपा हिस्सा |
|---|---|---|---|---|
| 1. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उत्तन येथील रॉयल इंग्लिश स्कुल ते धावगीकडे जागारा रस्ता तयार करणे. | रु. 85,00,000/- | रु. 85,00,000/- | - |
| 2. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पूर्व) प्रभाग क्र. 22 मधील आरक्षण क्र. 184 मिरारोड स्टेशन पार्किंग मधील नाल्याची पूर्नबांधणी करणे व परिसरात लादीकरण करणे. | रु. 85,00,000/- | रु. 85,00,000/- | - |
| | एकुण | रु.1,70,00,000/- | रु.1,70,00,000/- | - |

वरील कामाबाबतची पुढील कार्यवाही नियमानुसार संबधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

(संजय काटकर, भाप्रसे)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत बांधकाम विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

PC-12/2024-25-ठराव

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## प्रशासकीय ठरावासाठी गोषवारा

## // बांधकाम/ विद्युत विभाग //

दि. ०८/०७/२०२४

**प्रकरण क्रमांक. ( ९० )** मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या संक्रमण शिबीराची देखभाल व दुरूस्ती कामे तसेच शुल्क वसूलीसाठी खाजगी संस्थेची नेमणूक करणेच्या प्रस्तावास मान्यता देणे.

## // प्रस्तावना //

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध विकासकांमार्फत भाडे तत्वावरील गृह संकुलन योजने अंतर्गत महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या इमारतीमधील सदनिकांमध्ये तसेच बैठया संक्रमण शिबिरात बीएसयुपी योजनेतील पात्र लाभार्थी, धोकादायक इमारतीमधील लाभार्थी, डी.पी. रोडमधील लाभार्थी तसेच रस्ता रुंदिकरणामधील लाभार्थी इत्यादींना स्थलांतरीत करण्यात आलेले आहे. सदर इमारतीमध्ये असलेल्या लिफ्ट, सार्व. विजे संबंधिची कामे, मोकळी जागा, उद्यान पार्किंग व कॉमन पॅसेज इ. ठिकाणी साफ-सफाई करणे, सुरक्षा रक्षक व लिफ्टमन, पाणी भरणे/ सोडणे पाण्याची टाकी, सेप्टीक टॅंक सफाई, इमारतीची सुरक्षा इत्यादी कामी होणाऱ्या देखभाल दुरुस्ती तसेच देखभाल दुरूस्ती इ. वसूलीसाठी खाजगी संस्थेची नेमणूक करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. मनपाची सदर मालमता खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | इमारतीचे नाव | इमारतीचा पत्ता | सदनिका संख्या | उद्वाहक संख्या |
|---|---|---|---|---|
| 1 | मे. लोढा (G+18) | महाजनवाडी रा.म.क्र.08 च्या बाजूस, ठाकूर मॉलच्या समोर | 632 | 07 |
| 2 | मे. एल.के.डी. पिनाकोला (G+16) | मंगलनगर, 15 नं. बस स्टॉप, मेरीगोल्ड | 505 | 04 |
| 3 | मे. मन R-1 व R-2 (G+23 & G+24) | मिरागांव, कमलेश नगर रोड, काशिमिरा (बृन्मुंबई महानगरपालिकेस 270 सदनिका हस्तांतरीत केल्या आहेत.) | 590 | 04 |
| 4 | मे. दर्वेश (G+22) | मौजे पेणकरपाडा, दहिसर चेकनाका जवळ, मिरारोड (पुर्व) | 413 | 02 |
| 5 | मे. एस.के. हाईट्स (G+19) | मौजे पेणकरपाडा, दहिसर चेकनाका जवळ, मिरारोड (पुर्व) | 296 | 03 |
| 6 | मे. एम्स इमारत क्र.4 (G+20) | इंद्रलोक, भाईदर (पुर्व) | 193 | 02 |
| | | एकुण | 2629 | 22 |

| अ. क्र. | मनपाने बांधलेल्या संक्रमण शिबीराचे ठिकाण | सदनिका संख्या |
|---|---|---|
| 1 | सिल्वर सरीता | 180 |
| 2 | पाली व्हिलेज | 372 |

| | | |
|---|---|---|
| 3 | आर.टी.ओ. आदिवासी | 108 |
| 4 | आर.टी.ओ. ऑफीसच्या मागे | 26 |
| | **एकुण** | **686** |

वरील सर्व मालमत्ता ठिकाणी स्थापत्य व विद्युत दुरूस्ती कामे, दिवे बदलणे, इमारतीच्या सुरक्षेसाठी सुरक्षा रक्षक, बाऊंसर नेमणे, लिफ्ट मॅन नेमणे, पाणी भरणे, सोडणे पाण्याची टाकी/ सेप्टीक टँकची सफाई करणे, इमारतीच्या पॅसेज, उद्यान, मोकळ्या जागेवरील दैनंदिन साफसफाई करणे, बंद दिवे बदलणे इ. कामे करण्यासाठी तसेच बैठ्या संक्रमण शिबिरा ठिकाणी देखिल सदर कामे व त्यासोबत शौचालय साफसफाई देखभाल दुरूस्तीसाठी स्वतंत्र एजन्सी नेमल्यास त्यांचेमार्फत मनुष्यबळ नेमून सर्व कामे करून इमारती वापरण्यास सुस्थितीत ठेवता येतील. त्याबदल्यात सदर रहीवाशांकडून सदर देखभाल व दुरूस्तीसाठी प्रति महिना रु.500/- शुल्क ठरविल्यास सदर शुल्क सदर एजन्सीमार्फत वसूल करण्याचे अधिकार देण्यास व त्याव्यतिरीक्त होणारा खर्च एजन्सीला महानगरपालिकेमार्फत देण्यासाठी प्रति सदनिका (इमारती व बैठी संक्रमण शिबिरासाठी वेगवेगळे) दर मागविल्यास काम करणे सुलभ होईल. सदर संक्रमण शिबिरावर होणारा व अपेक्षित खर्च तसेच रु.500/- प्रमाणे जमा होणारी रक्कम याबाबत अंदाजपत्रक करून निविदेत सदर बाबींचा समावेश करण्यात येईल.

सदर प्रस्तावामुळे सद्यस्थितीत संक्रमण शिबिरातील दुरावस्थाबाबत येणाऱ्या तक्रारी बंद होऊन सर्व कामे वेळेवर होऊ शकतील व इमारती सुस्थितीत राहून सदर इमारती मधील सार्वजनिक जागा, पॅसेज मधील दुरावस्था, होणारी नासधुस, तोडफोड यावर नियंत्रण तसेच भाडेकरूना काढणे, रिकामी सदनिकांचा ताबा घेऊन त्याची सुरक्षा देखभाल इ. जबाबदारी ही सदर एजन्सी/ कंत्राटदार यांची राहणार आहे. मा. आयुक्त यांनी E File No.560176 वर नोट क्र.13 वर मा. महासभेपुढे प्रस्ताव ठेवणेसाठी आदेशित केले आहे. तरी सदर प्रस्तावित प्रक्रीया करणेस प्रशासकीय ठरावाव्दारे प्रशासकीय व आर्थिक मान्यता व सदर धोरणास मान्यता देणेस शिफारस आहे.

(दिपक खांबित)
**शहर अभियंता**
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने**

मा. महासभा / स्थायी समिती सभा
बोषवारा प्राप्त दि. ०८/०६/२०२४ वेळ दु. १२.१० वा.
रजिस्टर नोंद अ. क्र. ४९२ सन २०२४/२५
[illegible]
लिपिक ०८/६/२४
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-05/DK/24-25/MG-6

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव ९० दिनांक :- ०८/०७/२०२४

**प्रकरण क्रमांक :- ( ९० )** मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या संक्रमण शिबीराची देखभाल व दुरूस्ती कामे तसेच शुल्क वसूलीसाठी खाजगी संस्थेची नेमणूक करणेच्या प्रस्तावास मान्यता देणे.

## कार्यालयीन प्रस्तावना

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध विकासकांमार्फत भाडे तत्वावरील गृह संकुलन योजने अंतर्गत महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या इमारतीमधील सदनिकांमध्ये तसेच बैठया संक्रमण शिबिरात बीएसयुपी योजनेतील पात्र लाभार्थी, धोकादायक इमारतीमधील लाभार्थी, डी.पी. रोडमधील लाभार्थी तसेच रस्ता रुंदिकरणामधील लाभार्थी इत्यादींना स्थलांतरीत करण्यात आलेले आहे. सदर इमारतीमध्ये असलेल्या लिफ्ट, सार्व. विजे संबंधिची कामे, मोकळी जागा, उद्यान पार्किंग व कॉमन पॅसेज इ. ठिकाणी साफ-सफाई करणे, सुरक्षा रक्षक व लिफ्टमन, पाणी भरणे/ सोडणे पाण्याची टाकी, सेप्टीक टँक सफाई, इमारतीची सुरक्षा इत्यादी कामी होणाऱ्या देखभाल दुरुस्ती तसेच देखभाल दुरूस्ती इ. वसूलीसाठी खाजगी संस्थेची नेमणूक करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. मनपाची सदर मालमत्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | इमारतीचे नाव | इमारतीचा पत्ता | सदनिका संख्या | उद्वाहक संख्या |
|---|---|---|---|---|
| 1 | मे. लोढा (G+18) | महाजनवाडी रा.म.क्र.08 च्या बाजूस, ठाकूर मॉलच्या समोर | 632 | 07 |
| 2 | मे. एल.के.डी. पिनाकोला (G+16) | मंगलनगर, 15 नं. बस स्टॉप, मेरीगोल्ड | 505 | 04 |
| 3 | मे. मन R-1 व R-2 (G+23 & G+24) | मिरागांव, कमलेश नगर रोड, काशिमिरा (बृन्मुंबई महानगरपालिकेस 270 सदनिका हस्तांतरीत केल्या आहेत.) | 590 | 04 |
| 4 | मे. दर्वेश (G+22) | मौजे पेणकरपाडा, दहिसर चेकनाका जवळ, मिरारोड (पुर्व) | 413 | 02 |
| 5 | मे. एस.के. हाईट्स (G+19) | मौजे पेणकरपाडा, दहिसर चेकनाका जवळ, मिरारोड (पुर्व) | 296 | 03 |
| 6 | मे. एम्स इमारत क्र.4 (G+20) | इंद्रलोक, भाईंदर (पुर्व) | 193 | 02 |
| | | **एकुण** | **2629** | **22** |

| अ. क्र. | मनपाने बांधलेल्या संक्रमण शिबीराचे ठिकाण | सदनिका संख्या |
|---|---|---|
| 1 | सिल्वर सरीता | 180 |
| 2 | पाली व्हिलेज | 372 |
| 3 | आर.टी.ओ. आदिवासी | 108 |
| 4 | आर.टी.ओ. ऑफीसच्या मागे | 26 |
| | **एकुण** | **686** |

वरील सर्व मालमत्ता ठिकाणी स्थापत्य व विद्युत दुरूस्ती कामे, दिवे बदलणे, इमारतीच्या सुरक्षेसाठी सुरक्षा रक्षक, बाऊंसर नेमणे, लिफ्ट मॅन नेमणे, पाणी भरणे, सोडणे पाण्याची टाकी/ सेप्टीक टँकची सफाई करणे, इमारतीच्या पॅसेज, उद्यान, मोकळ्या जागेवरील दैनंदिन साफसफाई करणे, बंद दिवे बदलणे इ. कामे करण्यासाठी तसेच बैठ्या संक्रमण शिबिरा ठिकाणी देखिल सदर कामे व त्यासोबत शौचालय साफसफाई देखभाल दुरूस्तीसाठी स्वतंत्र एजन्सी नेमल्यास त्यांचेमार्फत मनुष्यबळ नेमून सर्व कामे करून इमारती वापरण्यास सुस्थितीत ठेवता येतील. त्याबदल्यात सदर रहीवाशांकडून सदर देखभाल व दुरूस्तीसाठी प्रति महिना रु.500/- शुल्क ठरविल्यास सदर शुल्क सदर एजन्सीमार्फत वसूल करण्याचे अधिकार देण्यास व त्याव्यतिरीक्त होणारा खर्च एजन्सीला महानगरपालिकेमार्फत देण्यासाठी प्रति सदनिका (इमारती व बैठी संक्रमण शिबिरासाठी वेगवेगळे) दर मागविल्यास काम करणे सुलभ होईल. सदर संक्रमण शिबिरावर होणारा व अपेक्षित खर्च तसेच रु.500/- प्रमाणे जमा होणारी रक्कम याबाबत अंदाजपत्रक करून निविदेत सदर बाबींचा समावेश करण्यात येईल.

सदर प्रस्तावामुळे सद्यस्थितीत संक्रमण शिबिरातील दुरावस्थाबाबत येणाऱ्या तक्रारी बंद होऊन सर्व कामे वेळेवर होऊ शकतील व इमारती सुस्थितीत राहून सदर इमारती मधील सार्वजनिक जागा, पॅसेज मधील दुरावस्था, होणारी नासधुस, तोडफोड यावर नियंत्रण तसेच भाडेकरूना काढणे, रिकामी सदनिकांचा ताबा घेऊन त्याची सुरक्षा देखभाल इ. जबाबदारी ही सदर एजन्सी/ कंत्राटदार यांची राहणार आहे. मा. आयुक्त यांनी E File No.560176 वर नोट क्र.13 वर मा. महासभेपुढे प्रस्ताव ठेवणेसाठी आदेशित केले आहे. तरी सदर प्रस्तावित प्रक्रीया करणेस प्रशासकीय ठरावाव्दारे प्रशासकीय व आर्थिक मान्यता व सदर धोरणास मान्यता देणेबाबत प्रशासनाचा प्रस्ताव आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ९० दिनांक ८ /०६ /2024**

वरील प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452 (अ) च्या (1अ) व (1ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2)/ नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, श्री. संजय काटकर, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केल्यानूसार मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या संक्रमण शिबीराची देखभाल व दुरूस्ती कामे तसेच शुल्क वसूलीसाठी आणि प्रत्यक्षात होणाऱ्या खर्चाच्या व वसूलीच्या व्यतिरीक्त खर्च देणेसाठी खाजगी संस्थेची नेमणूक करणेच्या प्रस्तावास मान्यता देणे कामास या ठरावाव्दारे प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

सदर कामाबाबतची पुढील कार्यवाही नियमानुसार संबधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(संजय काटकर, भाप्रसे)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत :- बांधकाम/ विद्युत विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

PC-05/DK/24-25/MT-7

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## // पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग //

// गोषवारा // दि. ०e|०७|२०२४

**प्रकरण क्र** ( ९९ ) :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये भुयारी गटार योजनेची विविध ठिकाणी विविध स्वरुपाची कामे करणे कामास आर्थिक व प्रशासकिया मान्यता मिळणेबाबत.

मिरा भाईंदर क्षेत्रात एम.एम.आर.डी.ए. मार्फत व महानगरपालिकेमार्फत सिमेंट कॉक्रिट रस्त्याचे कामे सुरु आहेत. सदर रस्त्यामध्ये अद्याप मलवाहिनी अंथरलेली नसल्यामुळे रस्त्याचे काम करता येत नाही. त्यामुळे सदर रस्त्यावर मलवाहिनी अंथरणे गरजेचे आहे. तसेच सदर रस्त्यावरील इमारतींच्या मलजोडण्या करणे देखील गरजेचे आहे.

भुयारी गटार योजनेतील ठेकेदार मे. एस.पी.एम.एल यांनी त्यांच्या निविदेमध्ये असुन देखील न केलेली मलवाहिनी अंथरण्याची कामे करणे गरजेचे आहे. तसेच काही ठिकाणी मलवाहिनीच्या कामामध्ये गॅप असून सदर गॅपवर्कची कामे MICRO TUNNELLING व्दारे करणे गरजेचे आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मलशुध्दिकरण केंद्र क्र. 6ए येथे 60 एच.पी. क्षमतेचा STANDBY पंप बसविणे गरजेचे आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च (जी.एस.टी. सहित) |
|---|---|---|
| 1. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये पारंपरिक व मायक्रोटनलिंग पध्दतीने मलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रु.26,62,78,721/- |
| 2. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये सिमेंट कॉक्रिट रस्त्याच्या Alignment मध्ये मलवाहिनी पुरविणे व अंथरणे व सोसायटयांच्या मलजोडण्या (Property connection) करणे. | रु.19,34,61,669/- |
| 3. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मलशुध्दिकरण केंद्र क्र. 6ए येथे 60 एच.पी. क्षमतेचा STANDBY पंप पुरविणे व बसविणे. | रु.25,84,436/- |
| | एकूण रक्कम | रु.46,23,24,826/- |

सदर कामांना प्रशासकिय ठरावाद्वारे प्रशासकिय व आर्थिक मान्यता देणेस शिफारस आहे.

(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा.आयुक्त यांच्या मान्यतेने

I:\Tharav\SEWER AND PROPERTY LINE 1.Doc

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## // पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग //

### प्रशासकीय ठराव दिनांक ०९/ ०७ /२०२४

**प्रकरण क्र.** ( ११ ) :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये भुयारी गटार योजनेची विविध ठिकाणी विविध स्वरुपाचीकामे करणे कामास आर्थिक व प्रशासकिया मान्यता मिळणेबाबत.

**ठराव क्र.** ( ११ )

## कार्यलयीन प्रस्तावना

मिरा भाईंदर क्षेत्रात एम.एम.आर.डी.ए. मार्फत व महानगरपालिकेमार्फत सिमेंट कॉंक्रिट रस्त्याचे कामे सुरु आहेत. सदर रस्त्यामध्ये अद्याप मलवाहिनी अंथरलेली नसल्यामुळे रस्त्याचे काम करता येत नाही. त्यामुळे सदर रस्त्यावर मलवाहिनी अंथरणे गरजेचे आहे. तसेच सदर रस्त्यावरील इमारतींच्या मलजोडण्या करणे देखील गरजेचे आहे.

भुयारी गटार योजनेतील ठेकेदार मे. एस.पी.एम.एल यांनी त्यांच्या निविदेमध्ये असुन देखील न केलेली मलवाहिनी अंथरण्याची कामे करणे गरजेचे आहे. तसेच काही ठिकाणी मलवाहिनीच्या कामामध्ये गॅप असून सदर गॅपवर्कची कामे MICRO TUNNELLING व्दारे करणे गरजेचे आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मलशुध्दिकरण केंद्र क्र. 6ए येथे 60 एच.पी. क्षमतेचा STANDBY पंप बसविणे गरजेचे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च (जी.एस.टी. सहित) |
|---|---|---|
| 1. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये पारंपरिक व मायक्रोटनलिंग पध्दतीने मलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रु.26,62,78,721/- |
| 2. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये सिमेंट कॉंक्रिट रस्त्याच्या Alignment मध्ये मलवाहिनी पुरविणे व अंथरणे व सोसायटयांच्या मलजोडण्या (Property connection) करणे. | रु.19,34,61,669/- |
| 3. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मलशुध्दिकरण केंद्र क्र. 6ए येथे 60 एच.पी. क्षमतेचा STANDBY पंप पुरविणे व बसविणे. | रु.25,84,436/- |

सदर कामांना प्रशासकिय ठरावाव्दारे आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ०९ दिनांक ०८/०७/२०२४**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी वे विशेषत: कलम 452(अ) च्या (1अ) व (1ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारनुसार मी, संजय श्रीपतराव काटकर, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये भुयारी गटार योजनेची विविध ठिकाणी विविध स्वरुपाची कामे करणे कामांना आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च (जी.एस.टी. सहित) |
|---|---|---|
| 1. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये पारंपरिक व मायक्रोटनलिंग पध्दतीने मलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रु.26,62,78,721/- |
| 2. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये सिमेंट कॉक्रिट रस्त्याच्या Alignment मध्ये मलवाहिनी पुरविणे व अंथरणे व सोसायटयांच्या मलजोडण्या (Property connection) करणे. | रु.19,34,61,669/- |
| 3. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मलशुध्दिकरण केंद्र क्र. 6ए येथे 60 एच.पी. क्षमतेचा STANDBY पंप पुरविणे व बसविणे. | रु.25,84,436/- |

वरील पारित ठरावानुसार पाणी पुरवठा व मलनिसारण विभागाने नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(संजय श्रीपतराव काटकर) भाप्रसे
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईदर महानगरपालिका

E:\Tharav\SEWER AND PROPERTY LINE 1.Doc

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## // पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग //

// गोषवारा // दि.०८/०७/२०२४

**प्रकरण क्र** ( ९२ ) :- महानगरपालिकेचे होणारे आर्थिक नुकसान टाळणेकरिता प्रति टँकर आकारण्यात येणाऱ्या शुल्कामध्ये वाढ करणेबाबत.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांना पिण्याकरीता शुद्ध पाण्याचा भाईंदर (पुर्व) येथील फाटक जलकुंभावरुन पाणी पुरवठा करण्यात येतो तसेच महानगरपालिका हद्दीतील बांधकामांकरीता मिरारोड (पुर्व) हाटकेश, 15 नंबर बस स्टॉप येथिल TTP PLANT वरुन पुर्नप्रक्रिया केलेल्या पाण्याचा टँकरव्दारे पाणी पुरवठा करण्यात येतो.

मा.स्थायी समिती सभा दि.16/08/2018 ठराव क्र.49 व मा. महासभा दि. 31/01/2020 ठराव क्र. 84 अन्वये महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांना आवश्यकतेनुसार प्रति टॅकर रु.1000/-, महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टी परिसराकरीता प्रति टॅकर रु.500/- प्रमाणे शुद्ध पाण्याकरीता शुल्क आकारण्यात येत आहे व आदिवासी पाडयांकरीता मोफत टॅकर पुरवठा करण्यात येत आहे. तसेच बांधकामासाठी व इतर वापरासाठी पुर्नप्रक्रिया केलेले पाणी रु. 700/- प्रति टँकर शुल्क आकारले जात आहेत.

सद्दयस्थितीमध्ये टँकर पुरविण्यात येणाऱ्या ठेकेदारास रु.732/- प्रति टँकर अदा करण्यात येत आहे. त्यामुळे झोपडपट्टी करीता व बांधकामाकरीता होणाऱ्या टँकर पुरवठयामध्ये महानगरपालिकेस आर्थिक नुकसान होत असल्याने पुरवठा करण्यात येणाऱ्या टँकरच्या शुल्कामध्ये वाढ करणे आवश्यक आहे.

तरी आदिवासी पाडे (मोफत टँकर फेरे) वगळता महानगरपालिकेचे होणारे आर्थिक नुकसान टाळण्याकरीता इमारती तसेच झोपडपट्टीकरीता पिण्याचे शुद्ध पाणी व बांधकामाकरीता पुर्नप्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुरवठा करण्यात येणाऱ्या टँकरचे शुल्क हे प्रति टँकर रु. 1000/- इतके आकरण्यास मान्यता मिळणेस व प्रशासकिय ठरावाद्वारे शुल्क निश्चित करण्यास शिफारस असे.

सदर शुल्क वाढीस प्रशासकिय ठरावाद्वारे प्रशासकिय मान्यता देणेस शिफारस आहे.

(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा.आयुक्त यांच्या मान्यतेने

E:\Tharav\Tanker.Doc

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**// पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग //**

**प्रशासकीय ठराव दिनांक ०९/०७ /२०२४**

**प्रकरण क्र. ( १२ )** :- महानगरपालिकेचे होणारे आर्थिक नुकसान टाळणेकरिता प्रति टँकर आकारण्यात येणाऱ्या शुलकामध्ये वाढ करणेबाबत.

**ठराव क्र. ( १२ )**

## कार्यलयीन प्रस्तावना

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांना पिण्याकरीता शुद्ध पाण्याचा भाईंदर (पुर्व) येथील फाटक जलकुंभावरुन पाणी पुरवठा करण्यात येतो तसेच महानगरपालिका हद्दीतील बांधकामांकरीता मिरारोड (पुर्व) हाटकेश, 15 नंबर बस स्टॉप येथिल TTP Plant वरुन पुर्नप्रक्रिया केलेल्या पाण्याचा टँकरव्दारे पाणी पुरवठा करण्यात येतो.

मा.स्थायी समिती सभा दि.16/08/2018 ठराव क्र.49 व मा. महासभा दि. 31/01/2020 ठराव क्र. 84 अन्वये महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांना आवश्यकतेनुसार प्रति टँकर रु.1000/-, महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टी परिसराकरीता प्रति टँकर रु.500/- प्रमाणे शुद्ध पाण्याकरीता शुल्क आकारण्यात येत आहे व आदिवासी पाडयांकरीता मोफत टँकर पुरवठा करण्यात येत आहे. तसेच बांधकामासाठी व इतर वापरासाठी पुर्नप्रक्रिया केलेले पाणी रु. 700/- प्रति टँकर शुल्क आकारले जात आहेत.

सद्दयस्थितीमध्ये टँकर पुरविण्यात येणाऱ्या ठेकेदारास रु.732/- प्रति टँकर अदा करण्यात येत आहे. त्यामुळे झोपडपट्टी करीता व बांधकामाकरीता होणाऱ्या टँकरपुरवठयामध्ये महानगरपालिकेस आर्थिक नुकसान होत असल्याने पुरवठा करण्यात येणाऱ्या टँकरच्या शुल्कामध्ये वाढ करणे आवश्यक आहे.

तरी आदिवासी पाडे (मोफत टँकर फेरे) वगळता महानगरपालिकेचे होणारे आर्थिक नुकसान टाळण्याकरीता इमारती तसेच झोपडपट्टीकरीता पिण्याचे शुद्ध पाणी व बांधकामाकरीता पुर्नप्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुरवठा करण्यात येणाऱ्या टँकरचे शुल्क हे प्रति टँकर रु. 1000/- इतके आकारणेस गरजेचे आहे.

सदर शुल्क वाढीस प्रशासकिय ठरावाव्दारे प्रशासकिय मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ९२ दिनांक ०९/०७/२०२४**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी वे विशेषत: कलम 452(अ) च्या (1अ) व (1ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारनुसार मी, संजय श्रीपतराव काटकर, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामधील आदिवासी पाडे (मोफत टँकर फेरे) वगळता, इमारती, झोपडपट्टीकरिता पिण्याचे पाणी व बांधकामकरिता पुर्न:प्रकिया केलेल्या पाण्याचा पुरवठा करण्यात येणाऱ्या टँकरचे शुल्क हे प्रति टँकर रु. 1000/- इतके आकारण्यास प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

वरील पारित ठरावानुसार पाणी पुरवठा व मलनि:सारण विभागाने नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(संजय श्रीपतराव काटकर) भाप्रसे
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईदर महानगरपालिका

E:\Tharav\Tanker.Doc

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## // पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग //

## // गोषवारा // दि. ०८/०७/२०२४

**प्रकरण क्र (९३ )** :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (प.) मलनि:सारण केंद्र क्र.02 व मिरारोड (पुर्व) मलनि:सारण केंद्र 6C मधील प्रकिया केलेले पाणी मे. D B REALITY यांना वापरण्यासाठी उपलब्ध करून देणे कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत.

बृन्हमुंबई महानगरपालिकेच्या विविध महत्तवकांक्षी प्रकल्प राबविणे करीता CASTING YARD निर्माण करणेचे कार्यादेश बृन्हमुंगबई महानगरपालिकेने मे. D B REALITY यांना दिले आहेत. सदर CASTING YARD करीता लागणारे पाणी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पुर्नवापर धोरणांस अनुसरून मिरा भाईदर महानगरपालिकेच्या भुयारी गटार योजने अंतर्गत मलशुद्धीकरण केंद्र क्र.2 व 6C येथील प्रकिया केलेल्या पाण्याची मागणी केली आहे.

सदर पाणी मे. D B RELITY हे पाईपलाईनव्दारे CASTING YARD येथे घेऊन जाणार आहेत व तेथे त्यांचे मालकीचा TTP बांधून त्या पाण्याचा पुर्नवापर करणार आहेत असे कळविले आहे.

याबाबत अदा करण्यात येते की,

1. मलशुद्धीकरण केंद्र क्र. 2 व 6C येथे प्रकिया केलेले सांडपाणी खाडीत सोडले जाते.
2. या पाण्याचा उपयोग झाल्यास ते निश्चित पर्यावरण पुरक व महानगरपालिकेच्या धोरणांस सुसंगत असेल.
